रायगड सोमवार । दि. ३ ऑगस्ट २०२६ । अंक ५८ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष



"उषःकाल होता होता काळरात्र झाली... अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली..." या कवितेच्या ओळींचा उल्लेख करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शेकाप कार्यकर्त्यांना संघर्षाची मशाल तेवत ठेवण्याचे आवाहन केले. शेकाप हा वादळातील दीपस्तंभ आहे. ही विचारधारा जिवंत राहिली, तर पुरोगामी महाराष्ट्रही जिवंत राहील, असे प्रतिपादनही सपकाळ यांनी केले.

(छायाचित्र : समीर मालोदे)

# शेकाप हा विचारांचा दीपस्तंभ

## शेकाप वर्धापनदिन मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे गौरवोद्गार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**शेतकरी कामगार पक्ष हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर पुरोगामी विचारांचा दीपस्तंभ आहे. शेकापची विचारधारा ही समाजाला दिशा देणारी आणि संघर्षाला प्रेरणा देणारी आहे. या दीपस्तंभाची आज काँग्रेसला, महाराष्ट्राला आणि समाजाला पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी खालापूर येथील शेकापच्या वर्धापनदिनी काढले. काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षाची मैत्री ही केवळ राजकीय नाही, तर वैचारिक आहे. नियतीने आपल्या हाती दिलेला सत्तांतराचा डाव जिंकायचाच आहे, असा निर्धारही सपकाळ यांनी केला.**

शेतकरी कामगार पक्षाचा ७९ वा वर्धापन दिन सोहळा रविवारी (दि. २) खालापूर नगरीत दिमाखात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात, हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले विचार व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, हा विजय सहज मिळणार नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागेल, त्याग करावा लागेल आणि नव्या उमेदीने, नव्या जिद्दीने पुढे जावे लागेल. अहिंसक मार्गाने लढत लोकशाहीची ही लढाई जिंकायची आहे.

सत्ता आल्यानंतर सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवणे हेच आमचे ध्येय असेल. प्रत्येक हाताला काम, प्रत्येक उपाशी पोटाला अन्न आणि प्रत्येक गरजवंताला जगण्याचा आधार देण्याची जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे. बेरोजगारी वाढली, हाताला काम मिळाले नाही, तर हातात दगड घेण्याची वेळ येते. त्यामुळे रोजगारनिर्मिती हीच खरी राष्ट्रनिर्मिती आहे, असेही सपकाळ म्हणाले.



अधिकचे वृत्त पान ३/८ वर

# २०२९ ला इतिहास घडवायचाय

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन

मी खचणार नाही... तुम्हीही खचू नका. माझा उत्साह टिकवून ठेवण्याची ताकद तुमच्यात आहे, तो आणखी वाढवण्याची ताकदही तुमच्यातच आहे. शेतकरी कामगार पक्ष संपला, असे म्हणणाऱ्यांना आपल्या एकजुटीने आणि संघर्षाच्या बळावर उत्तर द्यायचे आहे. महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीच्या माध्यमातून २०२९ मध्ये नवा इतिहास घडवायचा आहे. त्यासाठी प्रथम ही जुलमी आणि अहंकारी राजवट सत्तेवरून खाली खेचावी लागेल, असा घणाघात शेकापचे सरचिटणीस तथा माजी आ. जयंत पाटील यांनी केला.

# पवार कुटुंबियांचे शेकापसोबत ऋणानुबंध

## आमदार रोहित पवार यांचे प्रतिपादन

शेकापच्या इतिहासाचा गौरव करत त्यांनी सांगितले, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्याच्या १३ दिवस आधी, म्हणजे २ ऑगस्ट रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. स्वातंत्र्यलढ्यात आणि सर्वसामान्यांच्या न्यायाच्या लढ्यात शेकापच्या नेत्यांनी दिलेले योगदान मोठे आहे. पवार कुटुंबाचे शेकापशी असलेले जुने संबंध अधोरेखित करत रोहित पवार म्हणाले, माझे पणजोबा आणि पणजी शेकापच्या विचारांशी जोडलेले होते. काटेवाडी येथे शेकापचे अनेक दिग्गज नेते येत असत. त्या विचारांचा प्रभाव आमच्या कुटुंबावर आजही कायम आहे. त्यामुळे शेकापशी आमचे नाते हे केवळ राजकीय नाही, तर वैचारिक आणि भावनिक आहे.



# शार्लोट लेकचे पाणी सोडण्यास मज्जाव करा

## ● माजी नगराध्यक्षांची नवी मुंबई महापालिकेकडे मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शार्लोट लेक तलावातील गाळ वाहून जावा यासाठी तलावाचे पाणी सोडण्याच्या माथेरान नगरपरिषदेच्या निर्णयाला विरोध होत आहे. माजी नगराध्यक्ष तथा स्वीकृत नगरसेवक मनोज खेडकर यांनी नवी मुंबई महापालिकेचे महापौर आणि आयुक्त यांच्याकडे निवेदन देत हा निर्णय तातडीने रोखण्याची मागणी केली आहे.



अमृत २.० योजनेंतर्गत शार्लोट लेकमधील गाळ काढण्याच्या कामासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून, गाळ तलावातून काढून नियोजित ठिकाणी नेण्याची तरतूद असल्याचा दावा खेडकर यांनी केला आहे. मात्र गाळ वाहून जाण्यासाठी डिसिल्टिंग गेट उघडून तलावाचे पाणी सोडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

खेडकर यांच्या मते, हा गाळ धावरी नदीमार्गे मोरबे धरणात जाऊन धरणाच्या पाणीसाठा क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. तसेच अनेक वर्षांपासून बंद असलेले डिसिल्टिंग गेट उघडणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे ठेकेदाराच्या फायद्यासाठी पर्यावरणाशी तडजोड करू नये, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या निर्णयावरून माथेरानमध्ये राजकीय वातावरण तापले असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि नवी मुंबई महापालिका काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पाणी सोडण्यास परवानगी नाही

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी स्पष्ट केले की, शार्लोट लेक हे प्राधिकरणाच्या मालकीचे जलस्रोत असून तलावाचे पाणी सोडण्यास कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

### मोरबे धरणात अतिरिक्त गाळ येऊ देणार नाही

नवी मुंबई महापालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मदन वाघचुडे यांनी सांगितले की, तक्रार प्राप्त होताच अधिकाऱ्यांची पाहणीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. पावसाळ्यात मोरबे धरणात अतिरिक्त गाळ जाण्याची शक्यता निर्माण होईल, असा कोणताही निर्णय किंवा परवानगी दिली जाणार नाही, अशी भूमिका महापालिकेने स्पष्ट केली आहे.

# ईव्हीएमविरोधात युवक आंदोलन छेडणार

## आ. रोहित पवार यांचा विश्वास



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

देशातील युवकांनी नीट पेपर फुटीविरोधात खूप मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनातून युवकांनी सरकारचा अहंकार मोडला होता. ईव्हीएमबाबत अनेकांना संभ्रम आहे. आगामी काळात हेच युवक एकत्र येऊन ईव्हीएमविरोधात लढा देणार आहेत. बॅलेट पेपरवर मतदान केले जावे, अशी युवकांची मागणी आहे, त्यामुळे इव्हीएमविरोधात युवक निश्चित आंदोलन छेडतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. रोहित पवार यांनी व्यक्त केला. पत्रकारांसोबत संवाद साधताना ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, अभिजीत दिपके यांनी दिल्लीमध्ये एक चांगला लढा पुकारला होता. या लढ्यातून अहंकारी सरकारला नमविण्याचे काम युवकांनी केले आहे. दिल्लीमध्ये झालेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांसह भाजपच्या कार्यकर्त्यांनी खिळे असलेल्या लाठीने हल्ला केला. पंतप्रधान मोदींसह अमित शाह यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. फक्त सोशल मीडियावर रिल चालावी म्हणून भावना व्यक्त केली असेल, तर ते चुकीचे आहे. मात्र, मोदींच्या या रिलवर युवकांनी त्यांना ट्रोल केले आहे. पूर्वीचे पंतप्रधान पत्रकारांसोबत संवाद साधत होते. परंतु, आताचे पंतप्रधान रिलवर बोलतात, असा टोला रोहित पवार यांनी लगावला. ते म्हणाले की, मॉर्डन आणि वेस्टन विचार देशासाठी योग्य नाही, असे अप्रचार भाजपची काही मंडळी करीत आहेत. परंतु, भाजपच्या मंत्र्यांची मुलेच अमेरिका, लंडन या देशांमध्ये शिक्षण घेत आहे. त्याला माझा विरोध नाही. मात्र, भाजपचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, अशी टीका रोहित पवार यांनी केली.

---

## सिडकोची के-६६ संचिका प्रकरण

# न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सिडको कार्यालयातील के-६६ ही महत्त्वाची संचिका गहाळ झाल्याप्रकरणी तपास पूर्ण करून सीबीडी पोलिसांनी तत्कालीन सिडको कर्मचारी लीला प्रीतम खंदारे यांच्याविरोधात दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे दोषारोपपत्र ३१ जुलै २०२६ रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बेलापूर न्यायालयात सादर करण्यात आले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित आरोपीला अटक करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदार अरुण मुंबईकर यांनी केली आहे.

राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठाच्या आदेशानंतर या प्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान संचिका गहाळ होण्यास तत्कालीन सिडको कर्मचारी जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वैभव पाटील यांनी लेखी पत्राद्वारे दिली आहे. मात्र, दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतरही संबंधित आरोपीला अटक झाली आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याचे मुंबईकर यांनी म्हटले आहे.

ही संचिका दिवंगत बाळकृष्ण काळू भोईर यांच्या साडेबारा टक्के गावठाण विस्तार भूखंड योजनेशी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. १९७० मध्ये सिडकोसाठी संपादित झालेल्या जमिनीच्या बदल्यात नियमानुसार अधिक भूखंड मिळणे अपेक्षित असताना केवळ १९९.९९ चौरस मीटरचा भूखंड देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणातील गैरव्यवहार लपविण्यासाठी संचिका गहाळ करण्यात आली असावी, असा संशयही मुंबईकर यांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात अन्य अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचाही सहभाग आहे का, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# 'महाराजस्व अभियाना'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। पाली । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील चेंढरे बायपास रोडवर आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर २०२६ मध्ये पशुसंवर्धन विभागाच्या माहिती दालनाला नागरिक आणि पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्टॉलला सदिच्छा भेट देऊन विविध योजनांची माहिती जाणून घेतली. यावेळी पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना, अनुदान आणि पशुपालकांच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत सहयोग गोशाळा यांच्या वतीने देशी गाईंच्या गो-आधारित उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली होती. महसूलमंत्री बावनकुळे यांनी या उत्पादनांची पाहणी करून कौतुक केले. शिबिरात नागरिकांनी गो-आधारित उत्पादनांना पसंती दिली असून, सुमारे सहा हजारांची विक्री झाली. या शिबिरामुळे पशुपालकांना विविध सुविधांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाली.

# गटारावर खाद्यपदार्थांचा व्यवसाय

## श्रीवर्धनमध्ये नागरिकांच्या आरोग्याशी खेळ



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरात गटारांवरील कडप्पांवर अनधिकृतपणे पक्के बांधकाम करून खाद्यपदार्थ तयार व विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उघड्या गटारांवर सुरू असलेल्या या व्यवसायामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधितांवर श्रीवर्धन नगरपरिषद कारवाई करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पावसाळ्यात शहरातील पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा, यासाठी नगरपरिषदेकडून गटारांची उभारणी करण्यात आली आहे. मात्र, त्याच गटारांवर अतिक्रमण करून खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याने पाण्याच्या निचऱ्यास अडथळा निर्माण होण्याबरोबरच दूषित अन्नामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एकीकडे स्वच्छतेचा संदेश देणारे प्रशासन, तर दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू असलेला हा प्रकार, यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करून नागरिकांच्या आरोग्याशी होणारा हा खेळ थांबवावा, अशी मागणी होत आहे.

> “नगरपरिषद या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत आहे. नगरपरिषदेच्या गटारांवर कडप्पा टाकून अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांसह त्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांवरही विविध कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल. दोषींना कोणतीही सूट दिली जाणार नाही. लवकरच कायद्याचा बडगा काय असतो, हे प्रशासन दाखवून देईल.”
>
> – ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगरपरिषद

### अन्नसुरक्षा कायद्याचे उल्लंघन

गटारांवर अन्नपदार्थ तयार करून विक्री करणे हे अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे थेट उल्लंघन असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. संबंधित विक्रेत्यांकडे वैध परवाने आहेत का, याची अन्न व औषध प्रशासनाने तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. अस्वच्छ वातावरणात तयार होणाऱ्या अन्नामुळे विषबाधा व साथीचे आजार पसरण्याचा गंभीर धोका असून, एफडीए आणि नगरपरिषद यांनी संयुक्त कारवाई करून अशा बेकायदेशीर व्यवसायांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

---

# निवडक

## पर्यटकाची सुखरूप सुटका

**नेरळ** : नेरळजवळील पेब किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या एका तरुणाचा डोंगर उतरताना पाय मोठ्या दगडाखाली अडकला. स्थानिक तरुण आणि नेरळ पोलिसांच्या तत्परतेमुळे त्याची सुखरूप सुटका करण्यात आली. शनिवार-रविवारच्या सुट्टीमुळे पेब किल्ल्यावर मोठ्या संख्येने पर्यटक आले होते. ट्रेकिंग करून परतत असताना ठाणे येथील रोहन जीनोरस कदम (२५) याचा पाय दगडाखाली अडकला. त्याच्या सहकाऱ्यांनी आणि आनंदवाडी येथील स्थानिकांनी सुटकेचे प्रयत्न केले; मात्र यश आले नाही.घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई कणके व महाकाल घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने लोखंडी पहारीचा वापर करून दगड बाजूला करण्यात आला आणि रोहनची सुखरूप सुटका करण्यात आली. या धाडसी आणि तत्पर बचावकार्यासाठी पर्यटकाने नेरळ पोलिस तसेच स्थानिक ग्रामस्थांचे आभार मानले.

## रफिक इशाकना नवजीवन

**कोर्लई** : मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष हॉस्पिटलमध्ये अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. प्रतीक गद्रे यांनी रफिक आमिस इशाक यांच्यावर ओआरआयएफ रेडियस-उल्ना प्लेटिंग ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या हाताचे कार्य पुन्हा सुरळीत होण्यास मदत झाली असून, त्यांना नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना महानगरांप्रमाणे आधुनिक आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या आयुष हॉस्पिटलने अल्पावधीतच रुग्णांचा विश्वास संपादन केला आहे. याच हॉस्पिटलमध्ये दंतचिकित्सक डॉ. अभिजीत जयंत फासे यांनी मोहम्मद दांडेकर यांच्यावर डेंटल इम्प्लांट शस्त्रक्रियाही यशस्वीपणे केली. आयुष हॉस्पिटलमध्ये अस्थिरोग, जनरल सर्जरी, जनरल मेडिसिन, स्त्रीरोग व प्रसूती, बालरोग, नेत्ररोग, दंतचिकित्सा, फिजिओथेरपी, पॅथॉलॉजी, डिजिटल एक्स-रेसह विविध अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत अवघ्या दीड महिन्यात १०० हून अधिक रुग्णांना मोफत व कॅशलेस उपचारांचा लाभ देण्यात आल्याची माहिती हॉस्पिटल व्यवस्थापनाने दिली. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेंतर्गत उपलब्ध मोफत उपचारांचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन आयुष हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने केले आहे.



## वडवलीत चारसूत्री भातलागवड

**श्रीवर्धन** : उमेद अभियान, कृषी विभाग आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वडवली येथील यशोदा महिला शेतकरी गट यांच्या माध्यमातून भात शेतीची चार सूत्री नियंत्रित पद्धतीने लागवड करण्यात आली. या उपक्रमाला महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

हा उपक्रम श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती सचिन किर, गटविकास अधिकारी राजू किरवे आणि तालुका कृषी अधिकारी श्रद्धा डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी उमेदचे तालुका अभियान व्यवस्थापक स्वप्नील जाधव, सहायक कृषी अधिकारी पंकज पाटील, अभिजित गावडे, किशोर गोरटे, मिनाक्षी पेडणेकर, विनिता किर तसेच परिसरातील महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चार सूत्री नियंत्रित लागवड पद्धतीमुळे पाण्याची बचत, उत्पादन खर्चात घट, जमिनीची सुपीकता टिकविणे आणि भात उत्पादनात वाढ होण्यास मदत होत असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करून अधिक उत्पादनक्षम व शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. महिला शेतकऱ्यांच्या या प्रयोगशील उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

---

# पालीत भाविकांचा महासागर

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

आषाढी संकष्टी चतुर्थीनिमित्त रविवारी अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथे श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली. रायगड, कोकणासह राज्याच्या विविध भागांतून आलेल्या भाविकांमुळे भरपावसातही मंदिर परिसर गजबजून गेला.



रविवारची सुट्टी असल्याने सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांनी पदयात्रा करत श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. मंदिर आणि गाभाऱ्याची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती, तर श्रींच्या मूर्तीला सुंदर वस्त्रालंकार परिधान करण्यात आले होते.

भाविकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे पालीतील हॉटेल, लॉजिंग, प्रसाद, पेढे, पापड, लोणचे, मिरगुंड तसेच इतर व्यावसायिकांची चांगली उलाढाल झाली. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. मोठ्या प्रमाणावर खासगी वाहने आणि लक्झरी बस दाखल झाल्याने काही काळ वाहतूक कोंडीही निर्माण झाली. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टने पिण्याचे पाणी, प्रसादालय, पार्किंग, स्वच्छतागृहे, भक्तनिवास आणि सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून दिली होती.

### व्यवसायाला संकष्टीची भरभराट

संकष्टी चतुर्थीनिमित्त हजारो भाविक पालीत दाखल झाल्याने स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळाली. प्रसाद, पूजेचे साहित्य, पेढे, पापड, लोणचे, मिरगुंड तसेच हॉटेल आणि लॉजिंग व्यवसायात दिवसभर चांगली उलाढाल झाली. संकष्टीमुळे भाविकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली. त्यामुळे व्यवसायाला मोठा आधार मिळाला, अशी प्रतिक्रिया व्यावसायिक मनोहर मोरे यांनी दिली.

> “संकष्टी चतुर्थीला होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन देवस्थान ट्रस्टने सर्व आवश्यक नियोजन केले होते. पिण्याचे शुद्ध पाणी, नाममात्र दरात प्रसादालय, सुसज्ज भक्तनिवास, मोफत वाहनतळ, स्वच्छतागृहे, सुरक्षा व्यवस्था तसेच दर्शनरांगेसाठी शेड आणि रेलिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना कोणतीही गैरसोय झाली नाही.”
>
> – जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

# सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आषाढ कृष्ण चतुर्थी अर्थात आषाढी संकष्टीनिमित्त रविवारी मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील स्वयंभू सिद्धिविनायक मंदिरात स्थानिकांसह पर्यटक भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली. पहाटे मंदिराचे सालकर विनायक पुरुषोत्तम जोशी आणि दैनंदिन पूजेचे गुरुजी महेश गोविंदराव जोशी यांच्या हस्ते सिद्धिविनायकाची षोडशोपचार पूजा करण्यात आली. मानकऱ्यांच्या पूजनानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले.



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

सकाळी रिमझिम पावसामुळे भाविकांची उपस्थिती कमी होती. मात्र सकाळी दहापासून दर्शनासाठी रांगा लागल्या. रविवारची सुट्टी आणि वर्षासहलीसाठी मुरुडमध्ये आलेल्या पर्यटकांमुळे सायंकाळपर्यंत मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेला. यावेळी स्थानिक भजनी मंडळांनी सुमधुर भजनांचा कार्यक्रम सादर केला, तर महाआरतीला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मंदिर परिसरात हार, फुले, दुर्वा, नारळ, पेढे आदी पूजेच्या साहित्याच्या स्टॉलवरही मोठी गर्दी पाहायला मिळाली.

## न्यायमूर्तींची तडकाफडकी बदली

**नवी दिल्ली** : नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणाच्या सुनावणीसाठी नियुक्त फास्ट ट्रॅक न्यायालयात विशेष न्यायमूर्ती अजय गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायमूर्ती अनु ग्रोवर बलीगा यांची दिल्ली उच्च न्यायालयाने प्रशासकीय फेरबदलांतर्गत बदली केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ ऑगस्ट रोजी होणार असून, दोषारोपपत्र आणि दोन आरोपींच्या जामीन अर्जांवर सुनावणी घेतली जाणार आहे. विशेष म्हणजे, हे प्रकरण न्यायमूर्ती अजय गुप्ता यांच्याच न्यायालयात सुरू होते.

# पराडे-दापिवली रस्त्यावरील गतिरोधक धोकादायक

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पराडेदापिवली मार्गावरील गतिरोधकांवर पांढरे परावर्तित पट्टे आणि इशाराफलक नसल्याने या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढत असून वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः पावसाळ्यात गतिरोधक नजरेस न पडल्याने दुचाकी व चारचाकी वाहने अचानक आदळून अपघात घडत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पराडे-दापिवली मार्ग हा औद्योगिक तसेच ग्रामीण भागाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. या मार्गावर दिवसभर केमिकल टँकर, ट्रक, बस, अवजड मालवाहू वाहने आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र, गतिरोधकांवर परावर्तित पांढरे पट्टे, रिफ्लेक्टर आणि इशाराफलक नसल्याने वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी अचानक ब्रेक लावावे लागत असून वारंवार अपघात घडत आहेत. यात अनेक दुचाकीस्वार जखमी झाले असून, वाहनांचेही नुकसान होत आहे. या समस्येबाबत स्थानिकांनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. भविष्यात एखादा गंभीर अपघात घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्यावरील सर्व गतिरोधकांवर पांढरे परावर्तित पट्टे रंगवून आवश्यक त्या ठिकाणी इशारा फलक आणि इतर सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# मंगळवारी जोशी अभिमत विद्यापीठाचा उद्घाटन सोहळा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

कोकणातील उच्च शिक्षणाला नवी दिशा देणाऱ्या श्री विठ्ठलराव जोशी अभिमत विद्यापीठाच्या (विशिष्ट श्रेणी) उद्घाटनाचा सोहळा मंगळवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता डेरवण-सावर्डे येथील एस.व्ही.जे.सी.टी. संकुलात होणार आहे. भारताचे ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ तथा पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते या विद्यापीठाचे उद्घाटन होणार असून, विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या शैक्षणिक वाटचालीतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी-२०२०) अनुषंगाने बहुविषयक, संशोधनाधारित आणि कौशल्याभिमुख शिक्षण देण्यावर विद्यापीठाचा भर राहणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी स्पेस सायन्स, नैसर्गिक शेती, बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, मानसशास्त्र, क्रीडा, दर्शनशास्त्र आदी आधुनिक आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम प्रस्तावित करण्यात आले आहेत. तसेच प्रमाणपत्र, पदविका, पदवी, ऑनर्स आणि संशोधन पदवीसह मल्टिपल एंट्री-एक्झिट पद्धतीची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास डॉ. पी.डी. पाटील, प्रा. डॉ. भूषण पटवर्धन, प्रा. डॉ. नितीन करमळकर, शशिकांत सुतार, डॉ. श्रीपाद बाणावली यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. शैलजा संजीव यादव आणि श्री. संजीव कुमार यादव यांनी खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. शिरीषकुमार महादेव बुटाला, राहणार मौजे जय भारत नाक्याजवळ टिळक रोड, आतवणे वाडा, नगरपरिषद घर नं. ५०२ बी, रूम नं. १, पनवेल, जि. रायगड-४१०२०६ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे वडवली ता. कर्जत, जि. रायगड | १६/१अ/३ | ०.२१.०० | २.४७ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन गिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी. याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०३.०८.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिरोगाव,
ता. कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

**टायटल व्हेरिफिकेशन कामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका पनवेल, यांचे हद्दीतील मौजे चेरवली, या गावाचे शिवारातील खाली नमुद केलेल्या मिळकती:-

| अ.क्र. | सर्व्हे नं/हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) | जमिनमालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | १२/३ | ०-४०-० | ३.२० | १. श्री. रंजीत कचरु गोदमगावे<br>२. श्री. आबासाहेब तुकाराम शिंदे<br>३. श्री. शंकर नागोराव सावंत |
| २. | १२/३ | ०-२०-० | १.६० | १. श्री. संजय चंदनमल जैन,<br>२. श्री. भानुदास अंबादास वाडीकर |

या दरोबस्त मिळकती.

सदर मिळकती श्री. रंजीत कचरु गोदमगावे, श्री. आबासाहेब तुकाराम शिंदे, श्री. शंकर नागोराव सावंत श्री. संजय चंदनमल जैन, श्री. भानुदास अंबादास वाडीकर यांचे स्वकष्टार्जित मालकीच्या मिळकती असून त्यांनी आमचे पक्षकारांबरोबर सदर मिळकतीचा व्यवहार निश्चित केलेला आहे. सदरील मिळकतीचे निर्वेधपणाविषयी खात्री करण्यासाठी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

उपरोक्त नमुद मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिन-लिज, अन्न-वस्त्र, विसार पावती, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, साठेखत, खरेदीखत, गहाणखत, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, करारमदार, जप्ती इत्यादी स्वरुपाचा तसेच बँक बोजा असल्यास त्यांनी आवश्यक त्या मुळ लेखी साक्षांकित कागदपत्रांनिशी लेखी हरकती प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांनिशी खुलासा करावा. अन्यथा उपरोक्त नमुद मिळकती या निर्वेध व बिनबोजाच्या आहे असे समजण्यात येईल.

मुदतीनंतर येणाऱ्या तसेच बिना कागदपत्रांचे हरकती तसेच परस्पर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही व ते आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतींवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, हि जाहीर नोटीस.

दिनांक:- ०२/०८/२०२६

पक्षकाराची सही-

**ॲड. प्राजक्ता प्रदिप जाधव**
ॲडव्होकेट

रा. घर नं.२०१, जान्हवी अपार्टमेंट, प्रांत ऑफिसच्या मागे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, मो. नं. ८३५६८९५६९८

(छायाचित्र : समीर मालोदे)



# स्मार्ट मीटरविरोधात रणशिंग फुंकणार

## शेकाप वर्धापनदिन मेळाव्यात जयंत पाटील यांचा निर्धार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

स्मार्ट मीटर योजनेविरोधात राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करत जयंत पाटील यांनी रणशिंग फुंकणार,असा निर्धार व्यक्त केला. गावोगावी बैठका घेऊन हजारोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढले जातील. स्मार्ट मीटर बसविण्यासाठी होणारी सक्ती सहन केली जाणार नाही. महावितरण आणि संबंधित अदानी कंपन्यांच्या मनमानीविरोधात गावपातळीवर तीव्र संघर्ष उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

जयंत पाटील म्हणाले, अनेक निवडणुका आपण लढलो, अनेक विक्रम केले. चढ-उतार प्रत्येक पक्षाच्या वाट्याला येतात. मात्र जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर लढणारा पक्ष म्हणून शेकापची ओळख आजही कायम आहे. देशातील शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि मध्यमवर्गीयांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारा नेता म्हणून राहुल गांधी यांच्याकडे देश आशेने पाहात आहे. विद्यार्थी आंदोलनाचा उल्लेख करत ते म्हणाले, देशात परिवर्तनाची ठिणगी नेहमी तरुणाईच पेटवत आली आहे. अलीकडील विद्यार्थी आंदोलनानेही तेच सिद्ध केले. त्या संघर्षात शेकाप खंबीरपणे विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभा राहिला. चित्रलेखा पाटील आणि अ‍ॅड. साम्या कोरडे यांनी दिल्लीतील जंतर-मंतरवर जाऊन विद्यार्थ्यांच्या लढ्यात सहभाग नोंदवत पक्षाची भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे २०२९ ची लढाई ही परिवर्तनाची लढाई असेल. कार्यकर्त्यांनी निराश न होता नव्या जोमाने कामाला लागावे.

गावपातळीवरील संघटनात्मक बांधणीवर भर देताना त्यांनी सांगितले, ग्रामपंचायतींपासून प्रत्येक निवडणूक महाविकास आघाडी म्हणूनच लढली पाहिजे. स्थानिक मतभेद बाजूला ठेवून विरोधकांना पराभूत करण्यासाठी एकजूट आवश्यक आहे. उरण तालुक्याने हे करून दाखवले आहे. त्याच धर्तीवर राज्यभर संघटन उभे राहिले पाहिजे.

दरम्यान, जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा संघटन बळकट करण्यावर भर देत, कॉम्रेड लेनिन यांनी आम्हाला एकच मंत्र दिला होता; तो म्हणजे, संघटना, संघटना आणि संघटना. हाच विचार गेली ७९ वर्षे शेकापला जिवंत ठेवत आला आहे. तोच विचार पुढे नेला, तर पक्षाचे भविष्य अधिक उज्ज्वल असेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांच्या आठवणींनाही उजाळा दिला. गोरगरीबांच्या हिताचे राजकारण करणारा नेता म्हणून आम्ही अंतुले साहेबांकडे पाहात होतो, असेही ते म्हणाले. शेवटी त्यांनी कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा कॉम्रेड लेनिन यांच्या विचारांची आठवण करून दिली. संघटना उभी करा, कार्यकर्ते घडवा आणि जनतेत राहा. हाच शेकापच्या पुढील वाटचालीचा खरा मंत्र आहे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

### विमानतळाला दिबांचे नाव द्या

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीचा पुनरुच्चार करत त्यांनी सरकारवर टीका केली. भूमीपुत्रांच्या भावनांचा आदर झाला नाही, तर तीव्र आंदोलन उभारावे लागेल. दुसऱ्या मुंबईच्या उभारणीत जशी फसवणूक झाली, तशी तिसऱ्या मुंबईत होऊ देणार नाही. पेण, पनवेल, उरण, अलिबाग आणि रोहा परिसरातील भूमीपुत्रांच्या हक्कासाठी शेकाप मित्रपक्षांसह मोठा संघर्ष उभारेल, असा इशारा त्यांनी दिला. पनवेल-उरण परिसरातील कार्यकर्त्यांना सावध राहण्याचे आवाहन करत ते म्हणाले, सरकारकडून निघणाऱ्या प्रत्येक आदेशावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. भूमीपुत्रांच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नका. पनवेल आणि उरणची जनता लाचार नाही; ती संघर्ष करून विजय मिळवणारी जनता आहे, असे गौरवोद्गार जयंत पाटील यांनी काढले.

### नव्या पिढीने संघर्षाची दिशा दाखवली

विद्यार्थी आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी म्हटले, या नव्या पिढीने देशाला संघर्षाची दिशा दाखवली. बारा वर्षांत कोणासमोर न झुकणाऱ्या सत्तेलाही विद्यार्थ्यांच्या एकजुटीपुढे माघार घ्यावी लागली. हीच युवाशक्ती परिवर्तन घडवू शकते. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्यावरील टीकेला उत्तर देण्याऐवजी संसद टाळल्याचा आरोप करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावरही निशाणा साधला.

### शेकापची चौथी पिढी दिल्लीच्या लढ्यात

आज आमच्या पक्षाची चौथी पिढी दिल्लीपर्यंत पोहोचली, याचा मला अभिमान आहे, असे सांगत जयंत पाटील यांनी युवा नेतृत्वाचे विशेष कौतुक केले. चित्रलेखा पाटील आणि अ‍ॅड. साम्या कोरडे यांनी विद्यार्थी आंदोलनात सक्रिय सहभाग घेत शेकापचा झेंडा दिल्लीत फडकवला. त्यांचे काम पाहून समाधान वाटते.

# नायक नहीं, खलनायक हूँ मैं!

## पंतप्रधानांवर सपकाळ यांचा निशाणा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पंतप्रधानांचे नाव न घेता हर्षवर्धन सपकाळ यांनी ''नायक नहीं, खलनायक हूँ मैं!'' या चित्रपटातील प्रसिद्ध संवादाचा उल्लेख करत मोदी सरकारवर टीका केली. देशाच्या पंतप्रधानांनी लोकशाही मूल्ये जपत विरोधकांचा आदर करायला हवा. शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संवेदनशील भूमिका घेणे अपेक्षित असताना आंदोलने दडपण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. लोकशाहीत नायकाची भूमिका निभावण्याऐवजी विरोधकांना संपविण्याची मानसिकता धोकादायक आहे, असे



ते म्हणाले.

सध्याच्या राजकारणावर टीका करत ते म्हणाले, आज विचारापेक्षा पैसा मोठा मानला जात आहे. पक्षांतर, सत्तेसाठी होणारी तडजोड आणि नीतीमूल्यांचा ऱ्हास ही चिंतेची बाब आहे. मात्र, शेतकरी कामगार पक्षाने आजही आपल्या विचारांची आणि तत्त्वांची कास सोडलेली नाही. पक्ष मोठा की लहान, यापेक्षा त्याची वैचारिक मुळे किती खोलवर रुजलेली आहेत, हे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी मी शेकापच्या कार्यकर्त्यांना तिरंग्याचा सलाम करतो.

सपकाळ यांनी काँग्रेस आणि शेकापच्या भविष्यातील राजकीय सहकार्याचा पुनरुच्चार करत, पुरोगामी विचारांच्या या लढ्यात शेकापला अधिक बळ देत काँग्रेस पक्ष खंबीरपणे सोबत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

### शेकाप-काँग्रेसची साथ कायम राहील

शेतकरी कामगार पक्ष हा कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला वैचारिक पक्ष आहे. आगामी काळात शेकाप आणि काँग्रेस ही ताकद महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्रितपणे लढेल. अहंकाराने मस्तवाल झालेल्या सरकारला सत्तेवरून खाली खेचण्याचा निर्धार आपण सर्वांनी केला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. सपकाळ म्हणाले, देशात इंडिया आघाडी आणि महाराष्ट्रात महाविकास आघाडी आहे. राजकारणात कोण कोणासोबत राहील, याबाबत अनेक चर्चा होत असल्या तरी शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेस यांची वैचारिक साथ कायम राहणार, ही काळ्या दगडावरची रेष आहे. आगामी राजकीय संघर्षात शेकापला अधिक बळ देत काँग्रेस सोबत घेऊन पुढे जाईल.

### दलिंदर नाही... तर बिलंदर

पंतप्रधानांचे नाव घेत हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या खास शैलीत टीका केली. मी यापूर्वी दलिंदर हा शब्द वापरला होता. काहींनी माझी जीभ घसरल्याचे सांगितले. मात्र, दलिंदर हा संस्कृतमधील शब्द आहे. पण, आज मी एवढेच म्हणेन, ते केवळ दलिंदर नाहीत, तर एपस्टीन फाईलमधले बिलंदर आहेत. अशा प्रवृत्तीला लोकशाहीच्या मार्गाने पराभूत केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. शेकाप हा तुफानातील दिवा आहे. तो पेटता राहिला, तर पुरोगामी विचारांचा प्रकाश कधीही विझणार नाही, असा विश्वास सपकाळ यांनी व्यक्त केला.

### अरे दिवानो, मुझे पहचानो... कहाँ से आया मैं हूँ डॉन!

भाषणादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर टीका करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी ''अरे दिवानो, मुझे पहचानो... कहाँ से आया मैं हूँ डॉन!'' या लोकप्रिय हिंदी चित्रपटातील गाण्याची ओळ बोलून दाखवली. ''जगात एक असा नेता आहे, जो स्वतःला सर्वशक्तिमान समजतो. कधी एका देशावर, तर कधी दुसऱ्या देशावर युद्धाचे सावट निर्माण करून जगात अशांतता पसरविण्याचे काम तो करत आहे. शांततेचा संदेश देण्याऐवजी हातात बंदूक घेऊन जगाने आपल्या पुढे झुकावे, अशी ट्रम्प तात्याची भूमिका आहे. ही मस्तवाल वृत्ती जगासाठी धोकादायक आहे, अशी टीका त्यांनी ट्रम्प यांच्यावर केली.

### शेकाप माझ्या आज्याचा पक्ष

भावनिक होत हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, शेकापचे नाव घेतले की मला माझ्या आज्याची आठवण येते. हा पक्ष वाढत राहिला, की माझ्या आज्याच्या कष्टाची, त्यागाची आणि विचारांची आठवण कायम जागी राहते. आज्याला विसरणारा माणूस भूतकाळ विसरतो. ज्या समाजाला, पक्षाला आणि व्यक्तीला स्वतःचा इतिहास माहिती नसतो आणि वर्तमानाचे भान नसते, त्याचे भविष्य अंधारात जाते. म्हणूनच वैचारिक लढाई अधिक ताकदीने लढण्याची गरज आहे. आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी लोकगीताच्या ओळी म्हणत शेकापशी असलेली भावनिक नाळ व्यक्त केली. शेकापचे नाव घेताच मला माझे आजोबा आठवतात. त्यांच्या कष्टाने रापलेला चेहरा, ठिगळ लावलेला शर्ट, फाटकी चप्पल आणि पायांवरील भेगा माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. शेकाप म्हणजे कष्टकऱ्यांच्या घामाचा, श्रमाचा आणि स्वाभिमानाचा विचार आहे. त्यामुळे या पक्षाविषयी माझ्या मनात केवळ वैचारिक नव्हे, तर भावनिक जिव्हाळाही आहे, असे त्यांनी सांगितले.

# तरुणांनो, आपला टाईम आलाय!

## एकजुटीने लढण्याचे आ. रोहित पवार यांचे आवाहन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

युवकांनी आता अपना टाईम आयेगा असे म्हणण्याची गरज नाही. आपला टाईम आलाय असे समजून अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरून लढण्याची वेळ आली आहे. दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना जर कुणी झुकवले असेल, तर ते युवकांच्या एकजुटीने आणि संघर्षाच्या ताकदीने. त्यामुळे शेतकरी, कामगार, विद्यार्थी



आणि महिलांवरील अन्यायाविरोधात सर्व पुरोगामी संघटनांनी एकत्र येऊन लढा अधिक तीव्र केला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केले. पुढे ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य कसे असते, हे जगाला दाखवून दिले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिवरायांची समाधी शोधून त्यांच्या कार्याचा गौरव केला, तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहातून वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष उभारला. या महान विचारांचा वारसा लाभलेल्या रायगडच्या भूमीवर अन्यायाविरोधात लढण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या संघर्षशील परंपरेचे कौतुक करत त्यांनी सांगितले, भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकापने शेतकरी, कामगार, युवक आणि महिलांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. ही परंपरा भविष्यातही अधिक जोमाने पुढे जाईल, असा मला विश्वास आहे.

देशातील अलीकडील विद्यार्थी आंदोलनाचा उल्लेख करत आ. पवार म्हणाले, काही दिवसांपूर्वी देशभरातील युवकांनी अन्यायाविरोधात उभारलेल्या संघर्षाने सत्तेच्या अहंकारालाच झुकवले. युवकांची एकजूट ही कोणत्याही सत्तेपेक्षा मोठी ताकद असल्याचे त्या आंदोलनाने सिद्ध करून दाखवले. निवडणुकांमधील पैशाच्या वाढत्या प्रभावावर टीका करत ते म्हणाले, मतांसाठी हजार-दोन हजार रुपये वाटून लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, पैशाने निवडून आलेले लोकप्रतिनिधी सर्वसामान्यांकडे पुन्हा वळून पाहात नाहीत. त्यामुळे युवक, विद्यार्थी, शेतकरी आणि महिला यांनी जागृत होऊन संघटितपणे परिवर्तनासाठी पुढे आले पाहिजे.



### दिग्गजांचा सन्मान

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजातील तारपावादक भिकल्या धिंडा यांना नुकताच पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला. तसेच कराटेसह बॉक्सिंग अशा वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात शौर्य मिळवून सैन्य दलात लेफ्टनंट कमांडकर या पदावर असलेल्या शीतल गायकवाड या दिग्गजांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

## आजचा दिवस खालापूरसाठी ऐतिहासिक : शिवानी जंगम



शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या प्रारंभी शेकापच्या जिल्हा आघाडी प्रमुख शिवानी जंगम यांनी उपस्थित मान्यवर, पक्षाचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि राज्यभरातून आलेल्या बहाद्दर कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

यावेळी त्या म्हणाल्या, आजचा दिवस खालापूरसाठी ऐतिहासिक आणि अभिमानाचा आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्याची जबाबदारी खालापूरच्या कार्यकर्त्यांवर सोपविल्याबद्दल पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे त्यांनी आभार मानले. या व्यासपीठावर उभे राहून आपल्या सर्वांचे स्वागत करण्याची संधी मिळणे हा माझा वैयक्तिक सन्मान नसून, खालापूर तालुक्यातील प्रत्येक महिला कार्यकर्तीचा सन्मान आहे.

## संघर्षाशिवाय पर्याय नाही : चित्रलेखा पाटील

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

देशात लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर संघर्षाशिवाय पर्याय नाही. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हा केवळ एका लढ्याचा विजय आहे; पण ही लढाई इथे संपलेली नाही. सत्तेच्या अहंकारात बुडालेल्या सरकारने लोकशाहीची गळचेपी करण्याचे काम सुरूच ठेवले आहे. त्यामुळे काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांवर दगड मारू नयेत, असा इशारा शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला.

त्या म्हणाल्या, गेल्या काही दिवसांत देशाने लोकशाहीचा संघर्षही पाहिला आणि सत्तेचा अहंकारही पाहिला. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मिळाला तो विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे, संघर्षामुळे आणि सर्व विरोधी पक्षांच्या एकत्रित लढ्यामुळे. त्या प्रत्येक विद्यार्थ्याचा, लाल बावट्याचा आणि लोकशाही वाचविण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक पक्षाचा मला अभिमान आहे.

सरकारवर घणाघाती टीका करत त्या म्हणाल्या, एका राजीनाम्याने काहीच संपत नाही. आंदोलनादरम्यान अल्पवयीन मुला-मुलींवर झालेला लाठीमार, त्यांच्यावर झालेले अमानुष



अत्याचार आणि त्यानंतर केवळ माफी मागून विषय संपविण्याचा प्रयत्न हा संतापजनक आहे. एका १६ वर्षांच्या मुलाची आई म्हणून मी विचारते, आंदोलनाला गेलेल्या मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची होती? केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधत त्यांनी प्रश्न उपस्थित केला, आंदोलन करणारे विद्यार्थी गृहमंत्री होते का? राहुल गांधी गृहमंत्री होते का? की आमच्यासारखे कार्यकर्ते गृहमंत्री होते? कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची असताना विद्यार्थ्यांवर लाठ्या का बरसल्या? शांततापूर्ण आंदोलनाचे रूपांतर हिंसाचारात होऊच कसे दिले? सोशल मीडियावर आंदोलकांविरोधात करण्यात आलेल्या आरोपांवर भाष्य करत त्या म्हणाल्या, आंदोलक दगड घेऊन आले होते, ते समाजकंटक होते, असे कथित दावे करण्यात आले. मात्र, आधी स्वतःच्या पक्षातील आणि मित्रपक्षातील नेत्यांची बेताल वक्तव्ये थांबवा. स्वतः काचेच्या घरात राहून दुसऱ्यांवर दगड मारण्याचा नैतिक अधिकार कुणालाही नाही.

पुढे त्या म्हणाल्या, आज देशातील पुरोगामी पक्ष गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. आंदोलनातील लाठीमार, विद्यार्थ्यांवरील कारवाई आणि मृत्यूंसाठी जबाबदारी निश्चित झालीच पाहिजे. आता अति झाले आहे. ईव्हीएमच्या मुद्द्यावरही त्यांनी कार्यकर्त्यांना सज्ज होण्याचे आवाहन केले. ईव्हीएमबाबत जनजागृतीची मोठी मोहीम उभी करावी लागेल. गल्ली, बूथ आणि गावागावात जाऊन लोकांना जागे करावे लागेल. काही रुपयांसाठी मत विकू नका, कारण त्याची किंमत पुढची पाच वर्षे मोजावी लागते. लोकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांविरोधात जनतेत राग आहे. मात्र, तो केवळ मतांमध्ये रूपांतरित करण्यासाठी घराघरात जाऊन संवाद साधावा लागेल, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

## जाज्वल इतिहास पुढे नेणार : अ‍ॅड. मानसी म्हात्रे

शेतकरी कामगार पक्षाच्या महिलांचे संघटन मजबूत आहे. अन्यायाविरोधात लढा देण्याचे काम महिला सक्षमपणे करीत आहेत. सध्या सत्तेची दारे बंद आहेत. मात्र, आगामी काळात ती उघडणार आहेत. प्रत्येक ठिकाणी शेतकरी कामगार पक्ष लढत राहणार आहे. शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास हा संघर्षाचा आहे. तोच वारसा घेऊन शेकापचे नेते यांच्या मार्गदर्शनाखाली महिला वेगवेगळ्या प्रश्नांवर लढा



देत आहेत. शेतकरी कामगार पक्षाने अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात स्मार्ट मीटरविरोधात आंदोलन केले. वाढीव बिलाविरोधात आवाज उठवून प्रशासनाला जाब विचारण्याचे काम केले आहे. आगामी काळात या प्रश्नाबाबत राज्य पातळीवर लढा देऊन स्मार्ट मीटरची होळी केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशारा शेकाप महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी दिला. यावेळी त्या पुढे म्हणाल्या, शेकापचा जाज्वल इतिहास आहे. तो पुढे नेण्याचे काम महिला करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## आजही जनतेचा पक्षावर विश्वास : सुरेश खैरे



शेतकरी कामगार पक्ष कायमच शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा आवाज बनला आहे. वेगवेगळी आंदोलने, लढाईतून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम पक्षाच्या माध्यमातून केले आहे. स्वार्थासाठी अनेक जण पक्ष बदलत आहेत. मात्र, शेतकरी कामगार पक्षावर जनतेचा विश्वास आजही आहे, असे प्रतिपादन शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले. शेतकरी कामगार पक्षाने अनेक प्रश्नांची सोडवणूक केली आहे, असे सांगत त्यांनी पक्षाचा अहवाल वाचन केले. स्मार्ट मीटर, वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्यापासून केलेल्या कार्याच्या अहवालाचे त्यांनी वाचन केले.

### वेबसाईटचे उद्घाटन

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासूनचा इतिहास आजच्या पिढीला माहिती असावा, यासाठी शेकाप वर्धापन दिनानिमित्त वेबसाईटचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे आता घरबल्या शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासून सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, कामगारांसाठीचा लढा, आंदोलनाची माहिती उपलब्ध होणार आहे. ज्या नेते मंडळींनी पक्षासाठी काम केले, त्या सर्व नेतेमंडळींची नावे, माहिती आणि इतिहास या वेबसाईटद्वारे समजणार आहे.

### मान्यवरांची उपस्थिती

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आ. रोहित पवार, आ. बाबासाहेब देशमुख, माजी. आ. बाळाराम पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, खजिनदार अतुल म्हात्रे, डॉ. अनिकेत देशमुख, प्रा. एस.व्ही. जाधव, कार्यालयीन चिटणीस राजेंद्र कोरडे, शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस अ‍ॅड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, संतोष जंगम, अलिबागच्या नगराध्यक्ष अक्षया नाईक, नारायण घरत, खालापूरचे तालुका चिटणीस किशोर पाटील, रामदास जराते, बाबासाहेब देवकर, डॉ. आस्था देशमुख, जिल्हा चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सभासद, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सभासद, पक्षाचे सर्व तालुका चिटणीस, पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मोदी, तुम्ही माफ करणार?

वधस्तंभाकडे जाणाऱ्या येशूला पाहून गर्दीने हात उचलले. पण ज्यांनी आजवर आयुष्यात पाप केले नसेल त्यांनीच दगड मारावेत असे म्हटल्यावर सगळे हात खाली आले. शीशे के घर में रहनेवाले पत्थर नही फेंका करते हा हिंदी सिनेमातला डायलॉगही प्रसिध्दच आहे. त्याच धर्तीवर माफ कोणी कोणाला करावे असा प्रश्न विचारता येईल. आणि, ज्यांनी मुळात काही पाप केलेले नाही त्यांनीच माफ करावे असे त्याचे उत्तर देता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदींना सध्या जेन झींसोबत आपला संवाद नाही याची फार म्हणजे फारच जाणीव झालेली दिसते. म्हणूनच ते दर दिवसाआड रात्री उशिरा इन्स्टाग्रामवर एक व्हिडियो टाकत आहेत. परवा टाकलेल्या व्हिडियोमध्ये त्यांनी जेन झीने जंतरमंतरवर त्यांना ज्या शिव्या दिल्या त्याबद्दल माफ केल्याचे जाहीर केले. ही सगळी आपलीच मुले आहेत, माझ्याबद्दल वाईटसाईट बोलले असतील तर त्यांना समजून घ्यायला हवे अशी भाषा त्यांनी केली. जंतरमंतरवरच्या आंदोलनादरम्यान सोशल मिडियात रील्सचा एकच स्फोट झाला. यातली अनेक रील्स मोदींची टर उडवणारी होती. त्यात चांगले विनोद होते. पण हेही खरे की, अनेकांनी सभ्यतेच्या सर्व हद्दी पार केल्या व मोदींबाबत अत्यंत गलिच्छ भाषा वापरली. घाणेरड्या शिव्या देऊन त्यांचा उद्धार केला. हे अत्यंत आक्षेपार्ह होते. पण जंतरमंतरवर लाखभर तरुण जमले होते. अशाच लाखो तरुणांचा त्यांना देशभरातून पाठिंबा होता. त्यासाठी मुंबई, पुणे, हैदराबादपासून कोलकात्यापर्यंत मोर्चे निघाले. यातले बहुसंख्य तरुण हे शांततेच्या मार्गाने व सभ्य रीतीने मागण्या मांडत होते. काही जण मीम्स किंवा पोस्टर्समधून मजा करीत होते. पण त्यात असभ्य असे काही नव्हते. तरीही बहुतांश ठिकाणी या तरुणांना पोलिसांनी अडवले. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. दिल्लीमध्ये तर भयंकर लाठीमार करण्यात आला. त्या लाठीमाराची दृश्ये सर्व जगाने पाहिली. तरुण तरुणी शांतपणे रस्त्याने जात असताना अचानक पोलिस अंगात आल्यासारखे त्यांना मारताना दिसतात हे सर्वत्र दिसले. अनेक ठिकाणी साध्या वेशातले इसम पोलिसांच्या लाठ्या घेऊन वावरताना दिसले. ते नेमके कोण होते याविषयी शंका उपस्थित झाल्या. पण त्यांचे उत्तर मिळालेले नाही. किंबहुना, पोलिसांच्या रुपाने मोदी सरकारचा जो दहशतवाद दिसला त्याबद्दल कोणतीच उत्तरे अजून मिळालेली नाहीत.

## गुन्हे मागे घ्या

जंतरमंतरवरचे आंदोलन एक महिन्यापासून सुरू होते. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होतीच. पण एकूण परीक्षा व शिक्षण पध्दतीत बदल व्हावा असेही त्यांचे म्हणणे होते. या आंदोलनाकडे मोदी सरकारने साफ दुर्लक्ष केले. पूर्ण महिनाभरात एकही प्रतिनिधी त्यांच्याकडे चर्चेला पाठवला नाही. नंतर संसद मोर्चावरच्या लाठीहल्ल्यामुळे संतापाची लाट उसळल्यावर मोदींना जाग आली. मग त्यांनी नवीन कायदा आणू, नीट घेणाऱ्या यंत्रणेतील ४७ माणसांना काढून टाकू असे निर्णय घेतले. हे सर्व आधीच करता आले असते. ते न करता त्यांनी आंदोलकांना व देशातील जनतेला वेठीला धरले. यामध्ये सर्व समाजाची जी शक्ती व वेळ वाया गेला त्याबद्दल खरे तर मोदींनी जनतेची माफी मागायला हवी. संसदेतील लाठीमाराबाबत मोदींना आजतागायत एक शब्द काढलेला नाही. आपल्याला दिलेल्या शिव्या त्यांना दिसल्या. पण हा लाठीहल्ला, त्यापूर्वीचा आंदोलकांचा संताप हे काही त्यांना दिसले नाही. अजूनही दिसत नाही. ते मोठा उदारपणाचा आव आणून मुलांना माफ करतो असे म्हणत आहेत. पण त्यांच्या पोलिसांनी मुलांवर दाखल केलेले गुन्हे एका फटक्यात मागे घेतो असे काही ते म्हणत नाहीत. वास्तविक ते पंतप्रधान आहेत. रात्री आठ वाजता येऊन नोटबंदी करणे किंवा कोरोनाच्या काळात लोकांना फिरायला बंदी करणे असल्या बंदी त्यांनी एका फटक्यात जारी केल्या आहेत. त्याच धर्तीवर हे सर्व खटले मागे घ्यावेत असे आदेश ते देऊ शकतात. आंदोलकांनी कोणाला मारहाण केली असेल तर त्यांच्याविरुध्दचे गुन्हे ठीक आहेत. पण त्याच धर्तीवर पोलिसांनी केलेल्या विनाकारणी मारहाणीचे काय असा सवाल करायला हवा व त्याबद्दलची शिक्षाही मोदींनी जाहीर करायला हवी. ते न करता निव्वळ आपण संत असल्याचा आव आणणे म्हणजे निव्वळ ढोंगीपणा आहे.

## आधी तुम्ही माफी मागा

अर्थात, मोदी, त्यांची पार्टी आणि त्यांचा परिवार या रीतीचा ढोंगीपणा कायम करीत आलेले आहेत. तिकडे उत्तर भारतात आपल्या पंढरपूरच्या यात्रेसाठी कावड यात्रा निघते. पण फरक असा की आपले वारकरी हे अत्यंत गरीब, कोणालाही त्रास होऊ नये असे वैष्णवधर्मी असतात. तर कावड घेऊन जाणारे यात्रेकरू हे कमालीचे हिंसक व रानटी वागतात. रस्त्यावरच्या गाड्यांची, हॉटेल्स इत्यादींची तोडफोड करतात. हिंदू धर्माचे नाव घेऊन हे सर्व चालते. तरीही संघ परिवारवाले, भाजपवाले, हिंदू धर्मवाले कोणी याबद्दल बोलत नाहीत. निषेध करत नाहीत. हेच लोक जंतरमंतरवरच्या मुलांबद्दल मात्र त्वेषाने बोलतात. ते देत असलेल्या शिव्यांना शिव्या घालतात. शिव्या देणे हे वाईट असते. मुलांनी दिल्या तर वाईट आणि हिंदुत्ववादी गुंडांनी दिल्या तर त्या वाईट असे नसते. गेली बारा वर्षे मोदींच्या भाजपचा आयटी सेल नेहरु, गांधी, काँग्रेसवाले इत्यादींच्या नावाने गटार ओकतो आहे. यापैकी मोदींनी त्यांना एका शब्दानेही कधी सुनावलेले नाही. उलट मोदींनी स्वतःच निवडणूक प्रचारात गरळ ओकलेली आहे. काँग्रेस की विधवा, पचास करोड की गर्लफ्रेंड, दीदी ओ दीदी हे त्यांचे प्रचारातले मोती कोणी विसरलेले नाही. याबद्दल माफी तर सोडाच, पण प्रचारात अशा गोष्टी चालतातच असे म्हणून भाजपने याचे समर्थन केलेले आहे. या स्थितीत जाओ तुमको माफ किया वगैरे म्हणण्याचा मोदींना कोणताही अधिकार नाही. उलट मोदींनीच आधी आंदोलकांची माफी मागायला हवी. शिवाय त्यांची मुलांशी उदारपणे वागण्याची भावना सच्ची असेल तर त्यांनी मुलांविरुध्दचे गुन्हे तात्काळ मागे घ्यायला हवेत. त्यांचे करियर बरबाद केले जाणार नाही याची हमी द्यायला हवी. शिवाय, यापुढे कोणत्याही आंदोलकांशी लोकशाहीत जसे वागणे अपेक्षित असते तसे वागले जाईल असे सांगायला हवे. संवाद व चर्चा करायला हवी. चार वर्षांपूर्वी शेतकरी असोत की आता विद्यार्थी, यांनी शांततेनेच आंदोलन केले. भाजपवाले बाबरी मशीद पाडण्यापूर्वी देशभरात जी आंदोलने करीत होते ती अनेकदा हिंसक होत असत. त्यातून दंगलही झाल्या. अडवानींची रथयात्रा अडवल्यावर तर देशभर आग लागल्यासारखी झाली. शेतकरी व विद्यार्थी असे वागले नाहीत. तरीही मोदींनी त्यांना लाठ्या दिल्या. त्यांच्या रस्त्यात खिळे पेरून त्यांच्या गाड्या पंक्चर व्हाव्यात याची व्यवस्था केली. जंतरमंतरवर लाईट घालवणे, पाणी, टॉयलेट बंद करणे, त्यांचे स्टेज तोडणे असे प्रकार केले. दिल्लीत तर छऱ्याची बंदुक चालवली गेली. असली पापे केलेल्यांनी व त्याविषयी चकार शब्द न काढणाऱ्यांनी दुसऱ्यांना माफ करण्याची दांभिक भाषा बोलू नये.

---

**| विचार**

# आंदोलन नेमके कोणत्या वळणावर?

***'परीक्षा पे चर्चा'सारख्या कार्यक्रमातून विदयार्थ्यांशी संवाद साधणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी पेपरफुटीवर का बोलत नाहीत, असे विरोधी पक्षाने वारंवार विचारले. एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे मोदी म्हणाले मात्र शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबद्दल ते आग्रही नाहीत. या पार्श्वभूमीवर मोदी सरकारचा अबोला आणि बेफिकीरी सरकारला कुठे घेऊन जाते, हे आता पहायचे.***




**डॉ. सुकृत खांडेकर**

कॉक्रोच जनता पार्टीचा उदय देशाच्या सरन्यायाधिशांच्या एका टिपणीतून झाला. त्यावेळी अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या अभिजीत दीपकेच्या कल्पनेतून क्रॉक्रोच जनता पार्टीची सोशल मिडियावर निर्मिती झाली आणि देशातील अडीच कोटी तरूणाईने त्याला प्रतिसाद दिला. कॉक्रोच जनता पार्टीची देशातील राजकारण्यांनी टिंगलटवाळी केली. ही तर झुरळांची पार्टी म्हणून हिणावले गेले. भाजपाची बी टीम म्हणून कोणी संबोधले तर अभिजीत हा तर केजरीवालांचा माणूस आहे, अशी टीका झाली. अमेरिका सोडून अभिजीत दिल्लीत आला तेव्हा जंतरमंतरवर जेमतेम दोन-चार हजार तरूण जमले होते. तेव्हा हे आंदोलन गुंडाळले जाईल अशी भाकीते व्यक्त करण्यात आली. कॉक्रोच जनता पार्टीची पेपर फुटीच्या निषेधार्थ देशात लहान-मोठ्या शहरातून आंदोलने झाली पण त्याकडे कोणी गांभीर्याने बघितले नाही. जून महिन्यात अभिजीतच्या नेतृत्वाखाली कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत येऊन पुन्हा जंतरमंतरवर ठिय्या मांडला तेव्हाच मोठ्या आंदोलनाची चाहूल लागली होती. सोनम वांगचूक हे लडाखहून एक बॅग घेऊन दिल्लीला आले आणि थेट जंतरमंतरवर आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी शिक्षणव्यवस्थेच्या सुधारणेसाठी आमरण उपोषण सुरू केले तरी सरकारने लक्ष दिले नाही. जंतरमंतरवर काही विद्यार्थी उपोषणाला बसले, तरी त्याला मिडियातून प्रसिध्दी मिळत नव्हती. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि पेपरफुटीनंतर मानसिक तणावामुळे आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना एक कोटी रूपये नुकसानभरपाई सरकारने द्यावी, अशा मागण्या कॉक्रोच जनता पार्टीने पुढे केल्या. दरम्यान, सोनम यांची प्रकृती झपाट्याने खालावली.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दोन दिवस अगोदर दिल्ली पोलिसांनी भल्या पहाटे सोनम यांना उचलले आणि चादरीत गुंडाळून थेट सफरदजंग इस्पितळात दाखल केले. तिथेच आंदोलनाची धार तीव्र झाली. खरे तर तीन आठवडे जंतरमंतरवर आंदोलन आणि उपोषण चालू होते, पण केंद्र सरकारच्या वतीने कोणीही त्यांच्याशी संवाद साधला नाही. भाजपाने युपीए सरकारच्या विरोधात देशभर विविध मुद्यांवर आंदोलने करून देशाची सत्ता मिळवली. पण जंतरमंतरवर आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांना जाऊन भेटावे, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, सरकारची बाजू समजावून सांगावी असे कुणालाही वाटले नाही. राहूल गांधी आणि काँग्रेस पक्ष पेपरफुटीच्या मुद्यावर देशभर आंदोलने करत आहेत. त्यांना काही ठिकाणी परवानगी नाकारण्याचे प्रकार घडले आहेत. वारंवार होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे सरकारची बदनामी होतेच. काँग्रेसने हा मुद्दा शस्त्र म्हणून वापरायला सुरूवात केल्यामुळे भाजपानेच कॉक्रोच जनता पार्टीला या मुद्द्यावर आंदोलन करायला सांगितले असाही प्रचार झाला. जंतरमंतरवर राहुल गांधी का फिरकले नाहीत, म्हणून प्रश्न विचारले गेले. जंतरमंतरवरील आंदोलनात कोणत्याही राजकीय पक्षांचा झेंडा नव्हता. कोणत्याही राजकीय नेत्याला मंचावर बोलावण्यात आले नाही. काँग्रेस, उबाठा सेना, सपा, आप आदी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आंदोलनस्थळी जाऊन पाठिंबा दिला. पण प्रत्यक्ष मोर्चात कुठेही राजकीय नेता आघाडीवर नव्हता. मग सरकारला आंदोलकांशी चर्चा करायला अडचण का वाटत होती?

नेमक्या याच टप्प्यावर आंदोलक कोण आहेत, ते स्वत:ला काय समजतात, सरकारला आव्हान देतात म्हणजे काय, मंत्र्यांचा राजीनामा मागण्याची त्यांची हिंमत कशी होते, त्यांची पात्रता काय, अशा समजुतीत राज्यकर्ते असावेत. याच सरकारने पोलिसांच्या बळावर शेतकरी आंदोलन दडपले होते. सातशे शेतकऱ्यांचे बळी गेले तरी सरकार नमले नव्हते. आंदोलक शेतकऱ्यांना दिल्लीच्या सीमेवरच रोखले होते. विद्यार्थ्यांचे आंदोलन प्रखर झाल्यास पोलिसांच्या बळावर दडपता येईल हाच फॉर्म्युला दिल्लीत पुन्हा वापरण्यात आला. 'चलो संसद भवन' म्हणून निघालेल्या मोर्चावर पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला. मोर्चात पंधरा ते पंचवीस वयाचे विद्यार्थी होते. मुला-मुलींना पोलिसांनी खाकी वर्दीचा इंगा दाखवला. चपला, बूट, अस्ताव्यस्त पडले. डोकी फुटली, चेहरे रक्तबंबाळ झाले, पोलिसांच्या बळापुढे खाली पडलेल्या मुलांनाही लाठ्यांनी झोडपून काढले. पोलिसांवरही दगडफेक झाली. शंभर पोलीस जखमी झाले. पण दिल्लीमध्ये आणि जंतरमंतरभोवती कडक पोलीस बंदोवस्त असताना हे दगड आले कोठून, याचे उत्तर मिळाले नाही. आदल्या रात्री दगडांनी भरलेल्या पिशव्या घेऊन एक व्हॅन तिथे आल्याची माहिती आंदोलकांनी पोलिसांना दिली होती. अशा वेळी तत्काळ कारवाई का झाली नाही, हे मात्र उमगले नाही.

शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीने केलेले आंदोलन हे नेतृत्वहिन होते. अभिजीत दीपके हा काही अनुभवातून कार्यकर्ता ते नेता बनलेला नाही. त्याला पोलिसांनी उचलून केरळ हाऊसमधे नेले. त्याचे दोन सहकारी सौरभ दास आणि आशुतोष रांका हे केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांना मागण्यांचे निवेदन देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेले. सोनम वांगचूक यांना तर पोलिसांनी अंधारातच उचलून नेले. संसदेच्या अधिवेनोच्या पहिल्या दिवशी एक लाखावर तरूणाई जंतरमंतरकडे जमली. नेता नसल्याने कोणत्याही रस्त्याने विद्यार्थ्यांचे समूह घोषणा देत फिरत होते. नेमके काय करायचे, कुठे जायचे हे कुणाला ठाऊक नव्हते. अशा दिशाहिन, शस्त्रहिन विद्यार्थी समुहावर बेछूट लाठीमार करणे व त्यांना रक्तबंबाळ होईस्तोवर मारणे किती योग्य आहे? रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी हे काय मोदी सरकारचे शत्रू होते का, देशद्रोही होते का, शिक्षणपध्दतीत सुधारणा व्हावी असे त्यांना वाटते, पेपरफुटीचे प्रायश्चित्त म्हणून शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी त्यांची मागणी होती. मग लाठीमार आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून या नव्या पिढीवर पोलिसांनी सूड का उगवला? विद्यार्थी नसलेले अनेकजण आंदोलनात घुसले होते. तिथे समाजकंटकांनी हात धुवून घेतले, असा आक्षेप घेतला जात आहे. पोलिसांवर दगडफेक करणारे नेमके कोण होते, त्यांना या कामगिरीवर कोणी पाठवले होते हे प्रश्नही अनुत्तरीत आहेत. या प्रसंगी रस्त्यावरील मोटारींच्या काचा फोडल्या गेल्या.

पंजाब, हरयाणा, युपीमधून अनेकजण या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांचा शिक्षणाशी संबंधही नव्हता. काही कुरिअर बॉय होते, काही ट्रक ड्रायव्हर होते, कुणी रोजंदारीवर काम करणारे होते. आंदोलनात हिंसाचार कसा झाला, कुणी घडवला, विद्यार्थ्यांना पुढे करून आंदोलनाला गालबोट कुणी लावले हे पुढे आले पाहिजे. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या नेत्याला पोलिसांनी बॅरिकेट ओलांडताना उचलून फेकल्याचे कथित व्हिडिओ पोस्ट झाले आहेत. पण त्या आमदाराला तिथे कुणी जायला सांगितले होते? काश्मीर हा भारताचा भाग नाही असे सांगणाऱ्या अरूंधती राय जंतरमंतरवर पोचल्या होत्या. २६-११ च्या मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील अजमल कसाब याची फाशी रद्द करून दया दाखवावी म्हणून न्यायालयात दाद मागणारे कॉलिन गोन्सालवीस आंदोलनाच्या ठिकाणी गेले होते. नंदिता नारायण यांनी 'बस नाम रहेगा अल्ला का' हे पाकिस्तानी गीत तिथे गायले. पुन्हा ३७० कलम लागू करावे, अशी मागणी काश्मीरचे खासदार आगा मोहमंद यांनी केली. असे हे अनेक सरकारविरोधी जंतरमंतरवर कसे आणि का आले, हा प्रश्नही अनुत्तरीत राहिला. 'परीक्षा पे चर्चा' अशा कार्यक्रमातून विदयार्थ्यांशी नियमित संवाद साधणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी पेपरफुटीवर का बोलत नाहीत, असे विरोधी पक्षाने वारंवार विचारले. एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत मोदी म्हणाले, पेपरफुटीचा विषय अतिशय चिंताजनक आहे, तेराजणांना अटक झाली आहे, ते जेलमधे आहेत. जे दोषी आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीविषयी मात्र त्यांनी एक शब्दही उच्चारला नाही. या पार्श्वभूमीवर मोदी सरकारचा अबोला आणि बेफिकीरी सरकारला नेमके कुठे घेऊन जाते, हे आता पहायचे.

---

**| चर्चा आजची**

# पर्यटकांच्या हुल्लडबाजीला आवरा

**वैभव पाटील**

रायगड जिल्ह्यात पावसाने चांगलाच जोर धरला आहे. पहिल्या चरणात वरुणराजाने बऱ्यापैकी बरसात केलेली आहे. त्यामुळे आता जिल्ह्याला पावसाळी पर्यटनाचे वेध लागलेले आहे. पावसाळ्याच्या आगमनानंतर रायगड जिल्ह्यातील डोंगर-दऱ्या, हिरवागार निसर्ग आणि ओसंडून वाहणारे धबधबे पर्यटकांना खुणावू लागले आहेत. त्यामुळे वर्षा सहलीचे वेध लागले असून शनिवार-रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. पावसाच्या सरींनी निसर्गाला नवचैतन्य लाभल्याने विविध निसर्गरम्य स्थळांवर पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. धुक्याची चादर, हिरव्यागार दऱ्या, खळाळणारे धबधबे आणि गार वाऱ्याचा आनंद घेण्यासाठी कुटुंबीय, मित्रमंडळी तसेच तरुणाई मोठ्या प्रमाणात वर्षा सहलीचे नियोजन करत आहेत. पर्यटनस्थळांवरील हॉटेल्स, होमस्टे, रिसॉर्ट्स तसेच स्थानिक व्यावसायिकांनाही यामुळे आर्थिक चालना मिळत आहे.

यापूर्वी घडलेल्या अनेक दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने गेल्या चार वर्षांपासून पावसाळी पर्यटनस्थळे असलेल्या ठिकाणी बंदी घातली होती. यावेळीही जिथे जिथे धबधबे आहेत, अशा धोकादायक पर्यटन ठिकाणांवर बंदी घालण्यात आली आहे. अलिकडच्या काही वर्षांत जिल्ह्यातील पावसाळी पर्यटनाला बहर आला आहे. दळणवळणाच्या दृष्टीने सोयीस्कर असल्याने गेल्या १५ वर्षात पर्यटकांची संख्या वाढली आहे. सह्याद्रीच्या उंच आणि रांगड्या डोंगररांगांनी वेढलेल्या व निसर्ग सौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटन म्हणजे पर्यटकांना जणू पर्वणीच असते. जून महिन्यात पाऊस सुरू झाला की पर्यटक, निसर्गप्रेमींना वेध लागतात ते येथील धबधबे, वाहते पाण्याचे प्रवाह व धरणाच्या पाण्यात चिंब भिजण्याचे व मनसोक्त पावसाचा आनंद घेण्याचे. अनेकांची पावले आपोआप धबधबे, समुद्र किनारे, धरणे आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांकडे वळतात. उंचावरून कोसळणारा पाण्याचा प्रवाह, धुक्याचे वातावरण हे सारे अनुभवण्यासारखे असते.

पावसाळ्यात येथील अनेक ठिकाणे पर्यटकांनी गजबजलेली असतात. काही दंगेखोर व अतिउत्साही पर्यटकांमुळे पर्यटनाला गालबोट लागते. बहुतांश ठिकाणी कलम १४४ देखील लावले जाते. मात्र गजबजाटापासून दूर काही वेगळे व सुरक्षित स्पॉट्स आहेत, जिथे पावसाळ्याचा पर्यटकांची हमखास गर्दी असते. पावसाळ्यातही पर्यटनाला येणाऱ्यांची संख्याही लाखोंच्या घरात असते. उत्साहाच्या भरात काही पर्यटक नियम व कायदे धाब्यावर बसवतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.



पावसाळ्यात पर्यटक धबधब्यावर जाणे पसंत करतात. यामध्ये प्रामुख्याने अलिबाग तालुक्यातील सिद्धेश्वर, तिनवीर धरण, पनवेल तालुक्यातील देहरंग, गाढेश्वर धरण, कर्जतमधील आषाणे, सोलनपाडा खालापूर तालुक्यातील झेनिथ, माणगाव तालुक्यातील देवकुंड, ताम्हाणी घाटातील धबधबे आदींचा समावेश आहे. या ठिकाणी आतापर्यंत अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत. या ठिकाणी पर्यटक मद्यपान करून धिंगाणा करतात. मुलींची छेडछाड, पाण्यात खोलवर जाणे असे प्रकार घडत असतात. यामुळे अनेक दुर्घटना घडतात. काहींना आपले प्राण गमवावे लागले आहेत. पर्यटकांना सुरक्षा मिळावी, कोणताही अपघात होऊ नये, दुर्घटना घडू नये यासाठी रायगड जिल्हा प्रशासन लक्ष ठेवण्याच्या सूचना विभागांना देते. दरवर्षी प्रशासन प्रतिबंधात्मक उपाययोजना करते. जिल्ह्यात सर्वत्र आपत्तीच्या दृष्टीने धबधब्यांच्या ठिकाणी मद्यपान करण्यास मनाई करण्यात येते. असे असले तरी पर्यटकांकडून त्याचे सर्रासपणे उल्लंघन होताना दिसत आहे. धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यापेक्षा जिल्ह्यातील सुरक्षित धबधबे, ओढे व धरणे येथे पावसाळी पर्यटनासाठी नागरिक पसंती देतात. येथील धरणांच्या ओसंडून वाहणाऱ्या पाण्यात मौजमजा घेण्यासाठी पर्यटक गर्दी करत आहेत. रविवारी व सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. थोडी खबरदारी व अतिउत्साह टाळल्यास कुटुंब सहली, तरुणाई बरोबरच लहान मुलांसाठीही ही ठिकाणे सुरक्षित आहेत.

नव्याने येणारे पर्यटक धडपणे माहिती नसताना पाण्यात उतरण्याचे धाडस करतात. अपघात घडून काहींना प्राणाला मुकावे लागले आहे. खरे तर अशा ठिकाणी योग्य ते मार्गदर्शन करून पर्यटकांना आनंद घेऊ द्या, ही मागणी अनेकदा झाली आहे. मात्र स्थानिक प्रशासन धाडकन बंदीची कारवाई करून मोकळं होतं. परंतु पर्यटक येण्याचं काही थांबत नाहीत. पावसाळी पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगारही मिळतो. जी ठिकाणं खरोखरच धोकादायक आहेत तिथे बंदी असलीच पाहिजे. दरम्यान, वर्षा सहलीचा आनंद घेताना पर्यटकांनी सुरक्षिततेचे भान राखावे, धबधब्यांमध्ये अति साहस करू नये, नदी-ओढ्यांच्या वेगवान प्रवाहात उतरू नये, घसरड्या कड्यांवर सेल्फी घेणे टाळावे तसेच परिसर स्वच्छ ठेवून प्लास्टिकमुक्त पर्यटनाला प्राधान्य द्या.

---

**लोकसंसद**

## एआय निर्मित बालकांच्या अनुचित मिम्सचा वाढता धुमाकूळ

सोशल मीडियावर अधिक व्ह्यूज आणि लाईक्स मिळवण्यासाठी सद्या 'एआय' तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेले लहान बालकांचे विनोदी व्हिडिओ आणि विनोदी मिम्स मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. एआय निर्मित या काल्पनिक लहान बालकांच्या तोंडी विनोद निर्मितीसाठी विशेषतः नवरा-बायकोचे दुहेरी अर्थाचे, कौटुंबिक वादाचे आणि टोमण्यांचे संवाद देऊन विनोद निर्मिती केली जात आहे. सध्या सोशल मीडियावर अशा रील्स आणि मिम्सचा धुमाकूळ सुरु असून वरवर हे मिम्स गमतीशीर वाटत असले तरी त्याचा बालमनावर अत्यंत अनिष्ट परिणाम होत आहे. लहान बालके ही निष्पापतेचे प्रतीक असतात. मात्र एआयच्या माध्यमातून त्यांच्या चेहऱ्यावर प्रौढांसारखे हावभाव आणून त्यांच्या तोंडून कौटुंबिक वादाचे तसेच इतर थातुरमाथुर विनोद वदवून घेणे ही विकृती आहे. यामुळे बालपणाच्या पवित्र संकल्पनेचा अवमान होत असून सोशल मीडिया वापरणारी वास्तवातील लहान मुलेही हे मिम्स पाहत असल्यामुळे त्यांच्या बालमनावर अनुचित संस्कार होत आहेत. त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी हे अत्यंत धोक्याचे आहे. केवळ मनोरंजनाच्या नावाखाली बालकांच्या माध्यमातून विनोदांचे असे विकृत सादरीकरण करणे अत्यंत घातक आणि चिंताजनक असून एआय तंत्रज्ञानाचा असा गैरवापर रोखणे अत्यंत गरजेचे आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**| दिनविशेष**

# थोर स्वातंत्र्यसेनानी क्रांतिसिंह नाना पाटील

आपल्या देशाला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, यासाठी अनेक क्रांतिकारकांनी सर्व आयुष्य समर्पित केले. त्यातील अत्यंत प्रखर योद्धा म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील! नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्ह्यातील बहे या त्यांच्या आजोळी झाला. नाना पाटील यांचे मूळ गाव येडेमच्छिंद्र. वडिलांचे नाव रामचंद्र पाटील. नाना पाटील यांचे वाडवडील पंढरपूरच्या विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. त्यामुळे बालपणीच नाना पाटील यांच्या गळ्यात पांडुरंगाची माळ पडली.

महात्मा जोतिराव फुले यांच्या विचाराचा प्रसार गावागावांत जलसाच्या माध्यमातून केला जात होता. नानांनी बालवयापासूनच महात्मा फुले यांचे विचार ऐकले होते. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव नाना यांच्या व्यक्तिमत्त्वावर होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भास्करराव जाधव यांनी सांगली, सातारा, कोल्हापूर या भागात पुरोगामी विचारांची पेरणी केली होती. नाना यांच्यावर सत्यशोधक चळवळीचा प्रचंड प्रभाव होता. तलाठी म्हणून काम करत असताना ते सत्यशोधक विचारांचा प्रचार करायचे. तसेच स्वातंत्र्याचे महत्त्वही ते जनतेला पटवून सांगायचे. भास्करराव जाधव हे निवडणुकीला उभे असताना नाना यांनी त्यांचे समर्थन केले. त्यामुळे तत्कालीन शासन व्यवस्थेने नाना यांना तलाठी पदावरून निलंबित केले. वरिष्ठ अधिकारी म्हणाले, 'तुम्ही माफी मागा. आम्ही तुम्हाला नोकरीवर घेतो.' तेव्हा नाना इंग्रजांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना म्हणाले, 'तुम्ही लुटारू आहात. तुम्ही जुलमी आहात. त्यामुळे तुम्ही माफी मागायच्या लायकीचे नाही.' असा बाणेदारपणा नाना यांच्याकडे होता. नाना यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. गावोगावी प्रशिक्षण वर्ग सुरू करणे, गरिबांना न्याय मिळवून देणे, अस्पृश्यता निर्मूलन, हुंडाबंदी, बिनखर्चाचे विवाह करणे, संपूर्ण दारूबंदी, जुगारबंदी, गुन्हेगारांना शिक्षा, स्त्रियांना संरक्षण, वाचनालय सुरू करणे, काळाबाजार रोखणे, सावकारशाही नष्ट करणे आदी महत्त्वपूर्ण कार्य प्रतिसरकारने केले. इंग्रजांच्या काळात संपूर्ण देशभर जुलमी राजवट असताना सातारा, सांगली परिसरात सामान्य जनतेचे सरकार म्हणजेच प्रतिसरकार होते. नाना यांनी युवकांची एक आघाडी स्थापन केली. त्या आघाडीला तुफान सेना असे नाव दिले. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, कॅप्टन रामभाऊ लाड, नागनाथअण्णा नायकवडी हे नाना यांचे तरुण तडफदार, निर्भीड, लढवय्ये शिलेदार होते. कष्टकरी, शेतकरी, मजूर, स्त्रियांचा विकास व्हावा यासाठी काँग्रेसमधील केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत आदींनी ३ ऑगस्ट १९४७ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. नाना शेतकरी कामगार पक्षात आले. ते शेतकरी कामगार पक्षाचे धुरंदर, लढवय्ये, स्वाभिमानी आणि प्रामाणिक नेते होते. पुढे त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. नाना हे १९५७ मध्ये सातारा आणि १९६७ मध्ये बीड येथून दोन वेळा खासदार झाले. जनमाणसाच्या हक्क व अधिकारांसाठी संसदेत मराठी भाषेतून आवाज उठवणारा महाराष्ट्रातील पहिला खासदार म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील! केवळ राजकीय स्वातंत्र्य म्हणजे परिपूर्ण स्वातंत्र्य नव्हे, तर जनतेला शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, यासाठी नाना यांनी आवाज उठवला. गोवामुक्तीसाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. बेळगाव, कारवार हा भाग महाराष्ट्रात समाविष्ट झाला पाहिजे, यासाठी त्यांनी संघर्ष केला. त्यामुळे त्यांना सिमोगा या ठिकाणी तुरुंगवास भोगावा लागला. मुंबई गुजरातला देण्याचा मोरारजीभाई देसाई, पंडित नेहरू यांचा डाव होता.

# उरणमध्ये भाताची लागवड संथ गतीने

## ● पावसाच्या लहरीपणामुळे शेती धोक्यात ● नैसर्गिक नाले बंद झाल्यामुळे प्रवाह शेतीकडे

| चिरनेर | प्रतिनिधी |



उरण तालुक्यात काही दिवसापासून भातशेतीची लागवड करण्यायोग्यतेचा पाऊस सुरू आहे. त्यामुळे येथील भातशेतीत भात लावणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, भात लागवडीसाठी शेतकऱ्यांकडे पुरेशा प्रमाणात रोपवाटिका उपलब्ध नसल्यामुळे भाताच्या लागवडीची कामे अत्यंत संथ गतीने सुरू आहेत.

भात शेतीला अपेक्षित असणारा मान्सूनचा पाऊस फार उशिरा बरसला. त्यानंतर पुन्हा गायब झाला. त्यामुळे खरीप हंगामी शेती संकटात सापडली आधी लांबलेल्या आणि नंतर अतिवृष्टीमुळे भाताची रोपे पार कुजून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार, तिबार पेरणीचे संकट ओढवले. दोन तीन वेळा पेरणी करून देखील भात रोपांची उगवण व्यवस्थितरित्या न झाल्यामुळे शेतकऱ्यांवर काही क्षेत्र पडीक ठेवण्याची वेळ आली आहे. भात क्षेत्राला पुरतील एवढ्या प्रमाणात भाताची रोपे शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे येथील शेतकरी विजय पाटील यांनी सांगितले. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उरण तालुक्यात भात लागवडीच्या क्षेत्रात घट होणार असल्याचे कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी सांगितले. एकंदरीत निसर्गाचा लहरीपणा आणि तालुक्यात होऊ घातलेले औद्योगिकरण शेतकऱ्यांच्या भात शेतीच्या मुळावर उठले असून, चिरनेर परिसरात भात लागवडीच्या क्षेत्रात नव्याने होत असलेल्या मातीच्या भरावामुळे पुराचे पाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले पूर्णपणे बंद झाले आहेत. त्यामुळे नैसर्गिक नाल्यांच्या पाण्याचा प्रवाह गावाकडे व शेतीकडे वळला आहे. त्यामुळे भात शेतीत साचलेले पाणी बाहेर पडत नसल्यामुळे भाताची रोपे कुजून नष्ट झाली. याशिवाय गोदामांच्या कंपाउंड वॉलच्या उंच भिंतींमुळे शेतावर पॉवर टिलर जाण्याचे सोडाच, परंतु शेतकऱ्यांनाही शेतावर जाण्यासाठी पायवाट देखील राहिलेली नाही.

उरण तालुक्यातील दीड ते दोन हजार हेक्टर जमीनीवर भात पीके घेतली जात आहेत. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा भात लागवडीच्या क्षेत्रात घट होणार असून, ही चिंताजनक बाब आहे. आजच्या परिस्थितीत पाळीव जनावरे कमी झाल्याने शेतात चालणारा नांगर दुर्मिळ झाला झाला असल्यामुळे शेतकरी पॉवर टिलरच्या साह्याने शेतीची नांगरणी करत आहेत. ठराविक गावातील शेतकऱ्यांच्या शेतात दोन बैलांचा नांगर शेतीची नांगरणी करतांना दृष्टीस पडत आहे.

### भरतीचे पाणी शेतीत

तालुक्यात २ हजार ५०० हेक्टर पेक्षा अधिक शेतीचे क्षेत्र आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहे. त्यामुळे समुद्राच्या भरतीचे पाणी शेतीत शिरून शेकडो एकर जमिनीचे नुकसान झाले आहे. तर येथील विविध उद्योगामुळे शेतीतील पाण्याच्या नैसर्गिक वाटाच बंद केल्याने काही शेती नापिकी झाली असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले.

> गोदामे उभारताना किंवा भराव करताना संबंधित प्रशासनाने आणि गोदाम मालकांनी बाजूच्या शेतकऱ्यांच्या भात लागवडीसाठी पाण्याच्या निचराऱ्याचा विचार न करता व याबाबत बाजूच्या शेतकऱ्यांची संमती न घेताच धन दांडग्यांनी भराव करून गोदामे उभी केली आहेत.
> –कृष्णा अनंत म्हात्रे
> शेतकरी

दरम्यान उरण तालुका हा राज्यातील औद्योगिक तालुका बनला आहे. त्यामुळे येथील शेती संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. उरणच्या चिरनेर, कळंबूसरे, नागाव, केगाव, चाणजे, खोपटे, कोप्रोली, विंधणे, रानसई, वशेणी, पूनाडे, आवरे पाले, पिरकोन, वेश्वी, गोवठणे, बोरखार आदी गावात भात शेतीमध्ये भात पिकांची लागवड केली जात आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ ऑगस्ट

१) श्री. प्रभाकर शंकर थळे
सासवणे, अलिबाग, ३-८-१९४१

२) श्री. गजानन धर्माजी पाटील
बेलकडे, अलिबाग, ३-८-१९४१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



अद्रिक यतीश दोषी, १० वा वाढदिवस, अलिबाग



प्रियदर्शिनी मेहुल पाटील, ४ थ्या वाढदिवसानिमित्त, अलिबाग



सौ. मानसी मनोज गोतावडे वाढदिवस, गोंधळपाडा– अलिबाग

## एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी मुदतवाढ

**ठाणे** : एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटीकार्ड स्मार्टकार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्टकार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

---



## वरसगाव शाळेतील विद्यार्थ्यांना मदत

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील वरसगाव येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.धाटाव औद्योगिक वसाहतीतील निलिकाँन फुड ॲण्ड डाईज केमिकल कंपनी धाटाव या कंपनीच्या वतीने गेल्या काही वर्षांची परंपरा राखत या ही वर्षी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक आधार मिळाला आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक एकनाथ बागुल, जनार्दन राजिवले, राजेंद्र सानप, जाधव सानप, म्हसकर कुर्ले, राजिवले व मुख्याध्यापक शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच मोठ्या संख्येने पालकवर्ग उपस्थित होते.

## नेरळमध्ये आयुष्यमान भारतकार्ड नोंदणी शिबीर

| नेरळ | प्रतिनिधी |



नेरळ येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक यांना वृद्धपकाळात शासनाच्या आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा यासाठी आयुष्यमान भारत आरोग्यकार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी ज्येष्ठ नागरिक संघांना पुढाकार घेता होता.

केंद्र शासनाने आपल्या देशातील नागरिकांना ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत मिळावेत यासाठी आयुष्मान भारत योजनेचा कार्ड बंधनकारक आहे. या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सर्वांसाठी आयुष्यमान भारतकार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून आयोजित शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सावळाराम जाधव यांचे हस्ते झाले.

यावेळी मंडळाचे कार्याध्यक्ष दिपक मनवे, सुर्यकांत चंचे, विलास कांबळे, दशरथ जाधव, नीता जोगळेकर, भगवान चव्हाण, सुमन लोंगले, अर्जुन क्षीरसागर, रंभाजी भोईर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून सुभाष चव्हाण, डॉ. संगीता, डॉ. राजश्री उबाळे, डॉ. प्रशांत दिवटे यांच्या नेतृत्वाखालील १८ जणांच्या टीमने शिबीर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १२५ लाभार्थी यांनी आयुष्मान भारत कार्डासाठी नोंदणी केली होती.

---

## आंबा घाटात अवजड वाहनांना बंदी

| रत्नागिरी | प्रतिनिधी |



गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कोल्हापूर–रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग वरील आंबा घाटात रस्त्याला गंभीर भेगा पडल्याने रस्ता खचण्याचा धोका निर्माण झाला आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आंबा घाटातून सर्वप्रकारच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीस पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष मनुज जिंदल यांनी दिले आहेत. दरम्यान रस्त्याच्या डाव्या बाजूला मोठ्या भेगा पडल्या असून, लगतच सुमारे १०० मीटर खोल दरी असल्याने रस्ता खचल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ३१ जुलैपासून अवजड वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लागू करण्यात आले आ–हेत. अत्यावश्यक सेवेतील वाहने व हलक्या प्रवासी वाहनांना नियंत्रित वेगाने आणि आवश्यक खबरदारी घेऊन प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे. अवजड वाहनांसाठी रत्नागिरी–हातखंबा–पाली–अणुस्कुरा घाट–राजापूर, कोल्हापूर हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला असून, भुईबावडा व फोंडा घाटाचाही पर्याय उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

## शिवनगर प्राथमिक शाळेत खाऊ वाटप

खरोशी : तुषार म्हात्रे यांच्या वाढदिवसाच्या स्मृतिप्रीत्यर्थ राजिप प्राथमिक शाळा, शिवनगर केंद्र मोहोपाडा येथे विद्यार्थ्यांना शनिवारी (दि.१) रोजी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी विनोद म्हात्रे, संध्या म्हात्रे, चिन्मय म्हात्रे, प्रमोद खारकर, सतीश खारकर, शुभांगी खारकर, राजेश खारकर, जयश्री खारकर, मिताली पाटील उपस्थित होते.

---

# राजापूरची गंगामाई पावसाळ्यात प्रवाहीत

| राजापूर | प्रतिनिधी |



राजापूरची जगप्रसिद्ध गंगामाई सध्या पावसाळ्यातही दिमाखात प्रवाहित झाली असून मूळ गंगेसह गोमुखातून मोठ्या प्रवाहाने पाणी वाहत आहे. काशीकुंड तुडुंब पाण्याने भरले असून, परिसरातील इतर कुंडांमध्येही मोठ्या प्रमाणात पाणीसाठा पहावयास मिळत आहे. त्यामुळे गंगाक्षेत्रात पुन्हा एकदा भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. गंगाक्षेत्राला भेट दिली असता तेथे उपस्थित असलेल्या गंगापुत्रांच्या मतानुसार ८ जुलैला गंगेचे आगमन झाले आहे. ऐतिहासिक राजापूर तालुक्यातील ठळक वैशिष्ट्यापैकी एक असलेल्या राजापूरच्या गंगेला मोठा इतिहास आहे.

पूर्वी राजापूरची गंगा साधारणपणे दर तीन वर्षांनी प्रकट होण्याची परंपरा होती. गंगेचे आगमन हा राजापूरसह संपूर्ण कोकणासाठी धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा सोहळा मानला जातो. मात्र, गेल्या १५ ते २० वर्षांत गंगामाईच्या आगमन आणि गमनाच्या पारंपरिक चक्रात लक्षणीय बदल झाले आहे. यापूर्वी गंगामाई साधारण डिसेंबर ते जून या कालावधीत प्रकट होत असे आणि दोन ते अडीच महिने वास्तव्य केल्यानंतर अंतर्धान पावत होती. त्यानंतर जवळपास तीन वर्षांनी पुन्हा तिचे आगमन होत–होते.

मात्र, अलीकडील काळात हा नियम मोडीत निघाल्याचे दिसून येत आहे. गमन झाल्यानंतर अवघ्या वर्षभरातच गंगा पुन्हा प्रकट झाल्याच्या घटनाही घडल्या असून काही वेळा तिचा प्रवाह दीर्घकाळ कायम राहिल्याचे पहायला मिळाले आहे. गंगामाईच्या या बदलत्या प्रवाहामुळे गंगाक्षेत्राचे धार्मिक आणि आर्थिक चित्रही बदलले आहे. पूर्वी तीन वर्षांनी गंगा प्रकट होत असल्याने देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक राजापूरमध्ये दाखल होत.

---

उच्च दाबामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तूंना फटका | नियोजनशून्य कारभारामुळे नागरिक वेठीस

# सततच्या खंडित पुरवठ्याने उरणकर हैराण

| उरण | प्रतिनिधी |



उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी, बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीत तसेच चाणजे, नवघर, जासई जिल्हा परिषद मतदार संघातील गावांमध्ये रात्री, अपरात्री वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे ग्रामस्थांचा संताप शिगेला पोहोचला असून महावितरणच्या नियोजनशून्य कारभारामुळे ग्रामीण भागातील नागरिक अक्षरशः वेठीस धरले जात असल्याचा आरोप होत आहे. त्यातच वीजबिल मात्र, भरमसाठ येत असताना लोकप्रतिनिधी मात्र, मुक गिळून गप्प बसले असल्याने उरणच्या नागरिकांना वाली कोण असा प्रश्न जनमानसात उपस्थित केला जात आहे.

चिरनेर जिल्हा परिषद मतदार संघातील गावांमध्ये रात्रभर वीजपुरवठा खंडित राहिला, तर दुसऱ्या दिवशी सकाळी उशिरापर्यंत वीज न आल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. त्यात उच्च दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे महावितरण अनेकांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंना त्याचा फटका बसला, तसेच उरण शहर आणि चाणजे, नवघर जासई जिल्हा परिषद मतदार संघातील गावांमध्ये रात्री अपरात्री वारंवार विज खंडित होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे लघुउद्योग, विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. मात्र, असे असतानाही विज बिल मात्र, भरमसाठ येत आहे. त्यातच येथील लोकप्रतिनिधी मुक गिळून गप्प बसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली जात आहे.

अन्यथा संतप्त नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नसल्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

### कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

बैठकीतील निर्णयाकडे कानाडोळा उरण तालुक्यातील वीज समस्या बद्दल पनवेल येथील बैठकीत लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न जोरदारपणे उपस्थित करून संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, बैठकीनंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याने अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

> भविष्यातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.
> – प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्यमंत्री

---

# निवडक



## सोबती संस्थेतर्फे गणवेश वाटप

**खरोशी** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना सोबती संस्थेच्या वतीने शालेय गणवेश व दप्तराचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी सोबतीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने संचालिका डॉ. नीता कदम, भगवान शेटे, विजया जागडे मुख्याध्यापिका विद्या घरत, माता पालक सदस्या दिपिका साखरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या आढावकर तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदिवासी गरीब गरजू विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापिका विद्या घरत यांनी केले, तर निता कदम यांनी सोबती संस्थेच्या कार्याचा आढावा दिला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मानसी केदारे यांनी तर आभार सुनील पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्या शेट्ये, रिया वालम, आरती पाटील रंजना भऊड, सुलभा राजपूरकर यांनी सहकार्य केले.



## एमआर दिनानिमित्त रुग्णांना औषधांची भेट

**माणगाव** : समाजाने दिलेले प्रेम आणि विश्वास समाजालाच परत करण्याच्या उदात्त भावनेतून माणगाव–महाड मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह फ्रेंड सर्कलच्या सदस्यांनी एमआर दिनानिमित्त माणगाव उपजिल्हा रुग्णालयात गरजू रुग्णांसाठी औषधांचा महत्त्वपूर्ण साठा भेट देत सामाजिक बांधिलकीचा हृदयस्पर्शी आदर्श घालून दिला. या सेवाभावी उपक्रमाचे नेतृत्व अध्यक्ष जितेंद्र शेपूडे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव व महाड तालुक्यातील सर्व एमआर बंधूंनी एकदिलाने सहभाग नोंदवत समाजासाठी आपली संवेदनशीलता आणि माणुसकी जपली. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेणाऱ्या अनेक रुग्णांना या औषधांचा मोठा आधार मिळणार असून, उपजिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य सेवेलाही या मदतीमुळे बळ मिळणार आहे. एमआर दिनाचे औचित्य साधून राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ औषधांचे वितरण नसून, माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जिवंत संदेश आहे. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशाच सेवाभावी कार्यातून समाजात आशेचा आणि विश्वासाचा दीप तेवत राहावा, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## आंबिवलीतील धोकादायक खड्डे भरले

**पाताळगंगा** : सावरोली–खारपाडा मार्गावरील आंबिवली येथील



पुलाच्या उतरणीवर पडलेल्या धोकादायक खड्ड्यांमुळे वाहनचालकांसह ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता असल्याने परिसरात नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण होते. त्यामुळे माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांनी तातडीने खड्डे भरले नाही तर आंदोलनाचा इशारा देतात आयआरबीने तत्परता दाखवून खड्डे भरले. नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्न असल्याने तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली होती. आयआरबी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेत तात्काळ घटनास्थळी पथक पाठवले. संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून पुलाच्या उतरणीवरील सर्व खड्डे त्वरित बुजविण्याचे काम पूर्ण केले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित झाली असून वाहनचालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



## गव्हाणकर विद्यामंदिरात विविध स्पर्धा

**माथेरान** : प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन शनिवारी (दि.१) ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी चित्रकला, गायन, निबंध, हस्ताक्षर, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, पाढे पाठांतर, व्हिडिओ बनवणे राखी बनवणे आणि अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी सकपाळ हिने केले. तर विदुला गोसावी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## आयकरदात्यांची धान्य योजना बंद

**म्हसळा** : शासनाच्या मिशन सुधार उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच आयकर भरणाऱ्या लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत मिळणाऱ्या स्वस्त धान्य योजनेचा लाभ बंद करण्याची प्रक्रिया म्हसळा तालुक्यात सुरू झाली आहे. या कारवाईमुळे तालुक्यातील ५१२ शिधापत्रिकाधारकांचे धान्य वितरण बंद करण्यात आले आहे. तालुक्यात सध्या एकूण १४ हजार ३७५ शिधापत्रिका असून त्यांपैकी मोठ्या संख्येने लाभार्थी शासनाच्या मोफत अथवा सवलतीच्या धान्य योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, शासनाने अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पडताळणी मोहीम हाती घेतली आहे. आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार संबंधित लाभार्थ्यांची छाननी करण्यात आली. प्राथमिक पडताळणीत काही लाभार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही शासनाच्या धान्य योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार अशा लाभार्थ्यांना अपात्र ठरवून त्यांचे रेशन धान्य वितरण बंद करण्यात आले आहे.

# जेएनपीए बंदरात जहाजांना विलंब

## ।। आयात-निर्यात साखळी विस्कळीत।।देशभरातील उद्योगाला फटका

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जेएनपीए बंदरात अचानक कंटेनरची गर्दी निर्माण झाल्याने देशभरातून होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या आयात-निर्यातीच्या संपूर्ण पुरवठा साखळीत व्यत्यय येण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये जहाजांसाठी मोठा प्रतीक्षा कालावधीत वाढ होत चालली आहे.यामुळे खिशावर मोठा भार पडत असल्याने निर्यातदारांना आणखी मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत असल्याचे फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन्सने व्यक्त केली आहे.



जेएनपीए बंदरावरील कंटेनरच्या साठ्यामुळे जहाजांना धक्क्याला लागण्यासाठी जास्त वेळ थांबावे लागत आहे. कंटेनर यार्डमध्ये जागेची कमतरता आणि ट्रक हाताळणीतील विलंबामुळे माल वेळेवर रवाना होण्यास अडथळा येत आहे. या विलंबामुळे निर्यातदारांवर अतिरिक्त लॉजिस्टिक्स खर्च, कंटेनर डिटेंशन आणि डेमरेज शुल्क (विलंब शुल्क) या स्वरूपात मोठा आर्थिक भार पडत आहे. विदेशी खरेदीदारांना वेळेवर माल पोहोचवण्यात येणारी असमर्थता हे सर्वात मोठे आव्हान आहे, ज्यामुळे व्यापारी संबंधांवर ताण येण्याचा धोका वाढला आहे.

देशभरातुन विविध मालाची मोठ्या प्रमाणात आयात निर्यात केली जाते. यामध्ये उत्तर प्रदेशातील अनेक प्रमुख औद्योगिक शहरे त्यांच्या तयार मालाचा मोठा भाग विदेशात पाठवण्यासाठी जेएनपीए बंदरावर अवलंबून आहेत. या गर्दीचा राज्यातील कानपूर येथील चामड्याचा आणि घोड्यांच्या सामानाचा (सॅडलरी) उद्योग, नोएडातील तयार कपडे आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, मोरादाबाद येथील पितळेच्या वस्तू आणि हस्तकला, भदोही आणि वाराणसी येथील गालिचे, हातमाग आणि वस्त्रोद्योग, आग्रा आणि अलीगढ येथील पादत्राणे, हार्डवेअर आणि कुलूप उद्योगांवर थेट परिणाम झाला असल्याचे फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन्सचे सहायक संचालक आलोक श्रीवास्तव यांनी माहिती देताना सांगितले.

> मध्यपूर्वेतील देशांमधील युद्धजन्य परिस्थिती आणि अतिवृष्टी, वादळ आणि खराब हवामानामुळे काही तांत्रिक अडचणींमुळे अनेकदा जहाजांना बंदरात ये-जा करण्यासाठी विलंब होतो. या अडचणींमुळे खबरदारी म्हणून अधुनमधून जहाजांनाही बंदरात कार्गो चढउतार करण्यास मनाई केली जाते. यामागे आयात-निर्यातदार व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही याचीही दक्षता घेतली जाते.
>
> -रविशकुमार सिंह, जेएनपीए-उपाध्यक्ष.

फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन्सच्या कानपूर येथील कार्यालयाने या परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. उत्तर प्रदेशचा निर्यात व्यापार सुरळीतपणे सुरू राहाण्यासाठी बंदर प्राधिकरण, सीमाशुल्क आणि केंद्र सरकारला अतिरिक्त यार्ड क्षमता आणि रेल्वे-रस्ते वाहतूक वाढवून ही अडचण लवकरात लवकर दूर करण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचेही आलोक श्रीवास्तव यांनी सांगितले.

# पाण्यात लपलेल्या खड्ड्यांचा कहर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील कळंबोली परिसरात पावसाच्या पाण्याने भरलेले खड्डे आणि उघड्या अवस्थेतील चेंबर (मॅनहोल) नागरिकांच्या जीवावर बेतू लागले आहेत. कळंबोलीतील एमजीएम रस्त्यावर एका मागोमाग दोन दुचाकी अपघात झाल्याने परिसरातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मुसळधार पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे रस्त्यातील खोल खड्डे आणि उघडे चेंबर वाहनचालकांच्या नजरेस पडत नव्हते. अशाच एका पाण्याखाली लपलेल्या चेंबरमध्ये दुचाकी



घसरल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि तो रस्त्यावर कोसळला. या अपघातात दुचाकीस्वाराच्या पायाला गंभीर

### दुचाकीस्वार गंभीर जखमी

दुखापत झाली असून दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, याच ठिकाणी काही क्षणांतच आणखी एका दुचाकीस्वाराची गाडी खड्ड्यात आदळून तोही खाली पडला. सलग घडलेल्या या दोन अपघातांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, दरवर्षी रस्ते दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो, तरीही पावसाळा सुरू होताच रस्त्यांची अवस्था जीवघेणी बनते. खड्डे, उघडी चेंबर्स आणि अपुरी देखभाल यामुळे रोजच अपघात होत असून सामान्य नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघातग्रस्त नागरिकाने संतप्त प्रतिक्रिया देताना, एखाद्याचा जीव गेल्यावर किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला अशी दुर्घटना घडल्यावरच जाग येणार का? असा सवाल उपस्थित केला. स्थानिक नागरिकांनी कळंबोलीतील एमजीएम रस्त्यावरील धोकादायक खड्डे आणि उघडी चेंबर्स तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली असून, अन्यथा भविष्यात आणखी गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# महागणपती शेतकरी गटाला भात लागवडीचे धडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील महाराष्ट्र शासनाच्या शेतीनिष्ठ पुरस्काराचे मानकरी प्रफुल्ल खारपाटील यांच्या शेतात पानी फाऊंडेशनच्या चिरनेर येथील महागणपती शेतकरी गटाच्या वतीने, उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांच्या देखरेखीखाली शनिवारी (दि.१) कर्जत ५ या वाणाची चारसुत्री लागवड पद्धतीने प्रात्यक्षिके करण्यात आली.

यावेळी कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड,



शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी शेतात उतरून, चारसुत्री भात लागवड पद्धतीचा शेतकऱ्यांसोबत आनंद घेतला.

याप्रसंगी कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी शेतकऱ्यांना चारसूत्री पद्धतीच्या भात लागवडीचे महत्व व त्याचे प्रात्यक्षिके करून दाखविले.

# खारघरमधील द स्मोक शॉपवर छापा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारत देशात ई-सिगारेट उत्पादन, आयात-निर्यात, वाहतूक, साठवणूक आणि विक्रीवर संपूर्ण बंदी असतानाही, खारघर सेक्टर-४ मधील 'द स्मोक' शॉप या दुकानात उघडपणे ई-सिगारेटची विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खारघर पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी या दुकानावर छापा मारून तेथून हजारो रुपये किमतीचा प्रतिबंधित ई-सिगारेटचा साठा जप्त केला आहे.

खारघर सेक्टर-४ मधील भूमी टॉवर इमारतीतील शॉप नं. २० येथे असलेल्या द स्मोक शॉपमध्ये ई-सिगारेटची विक्री करण्यात येत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी येथे छापा मारला असता, विविध फ्लेवर्स आणि ब्रँड्सचा ई-सिगारेटचा साठा आढळला.

त्यावर पोलिसांनी हा ई-सिगारेटचा साठा जप्त करून दुकानचालक अहमद आदम साबीर (२२) याच्याविरोधात रीतसर गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याला ताब्यात घेऊन कायदेशीर नोटीस बजावल्याचे पोलिसांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी

**चिरनेर** : चिरनेर येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या सेकंडरी स्कूलच्या एस एस सी २००८-०९ बॅचच्या विद्यार्थ्यांच्या वतीने सामाजिक बांधिलकेतून प्राथमिक शाळा चिरनेर, केळ्याचा माळ येथील शाळेसाठी चार्जिंग साऊंडसह शालेय साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर आंगणवडातील १४ विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक वर्ग, शाळा कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# संत नामदेव विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

भोराई शिक्षण प्रसारक मंडळ नांदगाव संचलित संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा ५ ते ७, ८ ते १० आणि ११ वी-१२ वी अशा तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण २६ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. भूषण सुतार,




विद्या भिसे, शामल कंबलकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षक हंबीर यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांविषयी मार्गदर्शन केले. स्वातंत्र्य, स्वराज्य आणि सामाजिक जागृतीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी प्रा. अशोक शिंदे, सर्व शिक्षक वृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेंद्र निकुंभ यांनी मानले.

# कर्नाळ्यात दुर्मिळ रुडी-ब्रेस्टेड क्रेकची चाहूल

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

कर्नाळा पक्षी अभयारण्यात सध्या दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या रुडी-ब्रेस्टेड क्रेक या पाणथळ अधिवासातील पक्ष्याचे दर्शन घडत आहे. अतिशय लाजाळू स्वभावामुळे सहज न दिसणाऱ्या या पक्ष्याचे छायाचित्र टिपण्यात यश आल्याने पक्षीनिरीक्षक आणि वन्यजीव छायाचित्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

तांबूस डोके व मान, तपकिरी शरीर, पोटाजवळील काळ्या-पांढऱ्या आडव्या पट्ट्या आणि लांब बोटे ही या पक्ष्याची वैशिष्ट्ये आहेत.

दलदली, ओढे, पाणथळ



गवताळ प्रदेश आणि दाट झुडपांमध्ये तो वास्तव्य करतो. धोका जाणवताच क्षणार्धात गवतामध्ये अदृश्य होण्याची त्याची सवय असल्याने त्याचे निरीक्षण करणे आव्हानात्मक मानले जाते.

पावसाळ्यात कर्नाळा अभयारण्यातील जलस्रोत, ओलसर जमीन आणि वाढलेले गवत या पक्ष्यास पोषक अधिवास उपलब्ध करून देतात. कीटक, गोगलगायी, लहान जलचर आणि बिया यांवर तो उपजीविका करतो. पर्यावरणातील अन्नसाखळी टिकवून ठेवण्यातही या पक्ष्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार माधव आठवले यांनी सांगितले की, कर्नाळा अभयारण्यातील समृद्ध जैवविविधतेचे हे आणखी एक उदाहरण आहे. दुर्मिळ पक्ष्यांचे दर्शन ही निसर्गप्रेमींसाठी पर्वणी असली, तरी त्यांच्या अधिवासात कोणताही व्यत्यय न आणता सुरक्षित अंतरावरून निरीक्षण व छायाचित्रण करणे आवश्यक आहे.

वन्यजीव अभ्यासकांच्या मते, अशा दुर्मिळ पक्ष्यांची नियमित नोंद होत राहिल्यास कर्नाळा अभयारण्यातील जैवविविधतेच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल. पावसाळ्यात कर्नाळ्याचे जंगल पुन्हा एकदा पक्ष्यांच्या किलबिलाटाने आणि दुर्मिळ प्रजातींच्या वावराने समृद्ध झाल्याचे या दर्शनातून स्पष्ट होत आहे.



# वाजेकर विद्यालयात विचारप्रबोधनाचा जागर

**। उरण । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे शनिवारी (दि.१) ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विचारप्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजू खेडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरेश पाटील, तर आभार प्रदर्शन संगीता थोरात यांनी मानले. या कार्यक्रमास सुप्रिया पाटील, प्रा. बाबुलाल पाटोळे, सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## वादळाने कोळी बांधवांची पहिली समुद्रवारी हुकली | बोटी, जाळी सज्ज... आता नजर समुद्र शांत होण्याकडे!

# समिंद्राचा राजा वाऱ्याशी झुंजायला सज्ज!

**। मुरुड-जंजिरा । सुधीर नाझरे ।**

तीन महिन्यांच्या बंदीनंतर 'समिंद्र आपलो, मासोळी आपली अन् दर्याच आपलो संसार!' म्हणत मुरुडचा कोळी बांधव समुद्रवारीच्या तयारीला लागला आहे. १ ऑगस्टपासून मासेमारीचा हंगाम सुरू होत आहे; पण सुरुवातीलाच अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार होऊन वारा-पावसानं दर्या खवळला. त्यामुळे बोटी किनाऱ्यावर, जाळी बोटीत आणि कोळ्याची नजर मात्र दर्याकडे आहे. हवामान निवळलं की, ५ ऑगस्टपासून खोल समुद्रात जाण्याची तयारी सुरू असून, यंदा सुरमई, पापलेट, बोंबील, कोलंबी, मुशीच्या भरघोस शिकारीवर कोळी



बांधवांची सारी भिस्त आहे.

खोल समुद्रात जाण्यासाठी बोटींवर मासेमारीची जाळी चढविण्याचे काम सुरू आहे. डिझेल, पिण्याचे पाणी, अन्नधान्य, तेल तसेच आवश्यक साहित्याची जमवाजमव केली जात आहे. हवामान सुधारताच बोटी समुद्रात सोडण्याची तयारी मच्छिमारांनी केली आहे.

दरम्यान, प्रलंबित डिझेल परतावा, कर्जाचा वाढता बोजा आणि नैसर्गिक आपत्तीमुळे मच्छिमार आर्थिक अडचणीत आहेत. कोरोना काळातील कर्जाची परतफेड अद्याप पूर्ण झालेली नसल्याने प्रत्येक नव्या हंगामासाठी कर्ज काढावे लागत असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. मच्छिमारांसाठी अत्याधुनिक मत्स्यपिंजरा किनारपट्टीवर भाडेतत्त्वावर जागा उपलब्ध करून द्यावी, मासळी सुकविण्यासाठी प्रत्येक गावात ओटे उभारावे. प्रलंबित डिझेल परतावा तातडीने द्यावा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाईसाठी आपत्ती मदतीचे निकष बदलावे, अशी मागणी कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.

### समुद्र शांत होण्याची प्रतीक्षा

तीन महिन्यांच्या बंदीनंतर मासेमारीचा हंगाम सुरू झाला असला तरी खराब हवामानामुळे पहिली समुद्रवारी रखडली आहे. समुद्र शांत झाला की ५ ऑगस्टपासून बोटी खोल समुद्रात उतरविण्याची तयारी मच्छिमारांनी केली आहे.

> मासेमारी बंदीनंतरचा पहिला हंगाम आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. सुरुवातीलाच वादळामुळे समुद्रात जाता आले नाही तर मोठे आर्थिक नुकसान होते. शासनाने प्रलंबित डिझेल परतावा आणि नैसर्गिक आपत्तीची नुकसानभरपाई तातडीने द्यावी.
>
> – कोळी बांधव

## निवडक



### पोस्को स्टीलतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**माणगाव** : पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत राजिप शाळा चांदे आदिवासीवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, संपूर्ण रंगरंगोटी, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाचे बांधकाम, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करून कंपनीने सामाजिक बांधिलकी जपली. याप्रसंगी निजामपूर बीट विस्तार अधिकारी संजय अनंत पालांडे, महादेव बांगर, कविता वालेकर, दत्तात्रय पवार, नम्रता बडे, प्रतीक्षा होवाळ, चंद्रा पवार, शुभांगी शिंदे, पालक, ग्रामस्थ तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. तर पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीकडून राजू गाडुते, महेंद्र तट्टे, कुलदीप पुरंदरे, स्वप्निल पाटील आसावरी काळे यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



### नामदेव शिंपी समाज सामाजिक संस्था गुणगौरव

**तळा** : तळे नामदेव शिंपी समाज सामाजिक संस्था रायगड आयोजित नामदेव शिंपी समाज इंदापूर (रायगड) यांचे संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील, तालुक्यातील नामदेव शिंपी समाजात इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीमधील प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि जिल्ह्यातील विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा शनिवारी (दि. १) ऑगस्ट रोजी इंदापूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी, संत नामदेव, गुरुदत्त मंदिरात उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास नामदेव शिंपी समाज सामाजिक संस्था रायगडचे अध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, रवींद्र कालेकर, संजय जवंजाळ, जयकिरण बारटक्के, अरविंद करंबे, अनंतराव टमके, दत्तात्रय पांढरकामे, प्रेषित बारटक्के, मनीषा शिंत्रे, हेमंत बारटक्के, विश्वनाथ नाझरे, चंद्रकांत रोडे, गौरी बारटक्के, मीनल ढवळे, सचिन ढवळे, संजय ढवळे, मेघनाथ सातपुते, संजय वंडकर, दिलीप मेकडे, दिलीप करंबे, श्रीकांत कटारे यांचेसह प्रत्येक तालुका अध्यक्ष, प्रतिनिधी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, जिल्हा प्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील विशेष कार्य करणारी मान्यवर मंडळी, गुणवंत विद्यार्थी, पालक, समाजबांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्युत पुरवठा सुरळीत अभियंत्यांना निवेदन

**कर्जत** : माथेरान शहराचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडित होत असल्याने त्याचा थेट परिणाम माथेरानच्या व्यवसायावर होत आहे. या करता माथेरान नगरपालिकेचे नगरसेवक प्रवीण सकपाळ यांनी मुख्य अभियंता संजय पाटील व इतर संबंधित अधिकारी यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. या निवेदनात त्यांनी माथेरानच्या भौगोलिक परिस्थितीचा आढाव घेऊन सविस्तर माथेरानची व्यथा मांडली. माथेरान हे जगभरातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असून येथे देश विदेशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात तर पावसाळ्यात पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते नेमकी यांच वेळेत विद्युत पुरवठा खंडित होतो, त्यामुळे त्याचा थेट परिणाम येथील व्यवसायावर होत असून पाणी समस्यावर देखील ऐन पावसाळ्यात त्याचा परिणाम होतो. याबाबत त्यांनी निवेदनात अनेक गोष्टींवर दृष्टिक्षेप टाकला आहे. याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे नगरसेवक प्रवीण सकपाळ यांनी सांगितले.




### सेंट विल्फ्रेड्स कॉलेजमध्ये जनजागृती

**पनवेल** : सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, सामाजिक आणि कायदेविषयक उपक्रमांना वेग आला आहे. अनुभवाधारित शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, कायद्याचे व्यावहारिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी महाविद्यालयाकडून सातत्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. व्यसनमुक्त भारत अभियान अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिल्पा प्रहार यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे वैज्ञानिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम सविस्तरपणे समजावून सांगितले. व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीत युवकांची भूमिका, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच भविष्यातील विधिज्ञ म्हणून जनजागृती, न्यायप्रक्रिया आणि पुनर्वसन क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अवनी मिस्त्री तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅली व संगणक ज्ञान आवश्यक मोबाईल नं. ९८५०२९५७५५/८७९६८५५५५५
- O' NEST Group of Hotels येथे हाऊसकिपर, वेटर? रेस्टॉरन्ट मॅनेजर तसेच गार्डन व किचन कामासाठी १ जोडपे तातडीने हवे. ठिकाण अलिबाग/रत्नागिरी संपर्क- ९९७५५१६१२३.
- we are hiring -kokan estate project-mangofolks (premium UHDP mango project) land surveyor-1, field supervisor (land development)-4, field supervisor (agriculture)-3,Security guards-6, Labour Contraction. Contact-9325437216. Location-mangaon-Raigad.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कोंढेपंचतन येथे 'श्री'पद्धतीने भात लागवड

## श्रीवर्धन कृषी विभागाचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी|

हवामान बदल, पाण्याची टंचाई आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतीसमोरील आव्हाने वाढत असताना नैसर्गिक व शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी कृषी विभागाकडून विविध मार्गदर्शन व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच उपक्रमांतर्गत श्रीवर्धन तालुका कृषी अधिकारी श्रद्धा डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी पंकज पाटील यांनी कोंढे पंचतन येथील शेतकरी संगीता परबलकर यांच्या शेतात 'श्री' (System of Rice Intensification) पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष 'श्री'



पद्धतीने भात लागवड करून घेत या तंत्राची सविस्तर माहिती देण्यात आली.

पारंपरिक पद्धतीत जास्त वयाची रोपे वापरली जातात परंतू या पद्धतीमध्ये अवघ्या ८ ते १२ दिवसांची कोवळी रोपे योग्य अंतरावर आणि काळजीपूर्वक लावली जातात. त्यामुळे मुळांची वाढ अधिक जोमाने होऊन रोपे सशक्त बनतात. या पद्धतीत सुमारे ४० टक्के कमी पाणी लागते त्यामुळे पाण्याची कमतरता असलेल्या भागातही भात लागवड अधिक परिणामकारक ठरते. तसेच योग्य अंतरावर लागवड व मुळांचा चांगला विकास झाल्यामुळे सुमारे ३० टक्क्यांपर्यंत अधिक उत्पादन मिळण्याची क्षमता या लागवड पद्धतीत असल्याचे कृषी विभागाने सांगितले. यावेळी रासायनिक खते व जंतुनाशकांना पूर्णपणे फाटा देत जीवामृत, गो-कृपा अमृतम आणि बीजामृत यांचा प्रभावी वापर कसा करावा याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवत नैसर्गिकरीत्या अधिक उत्पादन कसे घ्यावे याचेही प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. फक्त लागवडीपुरतेच नव्हे तर पीक वाढीच्या संपूर्ण कालावधीत एकात्मिक कीड व्यवस्थापन, संतुलित खत व्यवस्थापन आणि तण नियंत्रण याविषयीही माहिती देण्यात आली. नैसर्गिक उपायांनी किडींचे नियंत्रण कसे करावे, याचेही प्रात्यक्षिक पंकज पाटील यांनी दाखवले. कमी मजुरी, खतांचा कमी वापर आणि कीड-रोगांचा कमी प्रादुर्भाव यामुळे एकूण उत्पादन खर्चातही मोठी बचत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रात्यक्षिकाला परिसरातील भात उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. अनेक शेतकऱ्यांनी या आधुनिक व नैसर्गिक पद्धतीबद्दल उत्सुकता व्यक्त करत आपल्या शेतातही मश्रीफ पद्धत अवलंबण्याचा मानस व्यक्त केला. कृषी विभागातर्फे तालुक्यातील इतर गावांमध्येही अशा प्रकारची प्रात्यक्षिके टप्प्याटप्प्याने आयोजित करण्यात येणार असून अधिकाधिक शेतकऱ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## तुकसईत शैक्षणिक साहित्य वाटप

**रसायनी :** स्थानिक निधी लेखापरीक्षा दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद यांच्या निधी लेखापरीक्षा संघाच्या वतीने खालापूर तालुक्यातील ग्राम पंचायत तुकसई येथे विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य, आदिवासी बांधव यांना शिधा वाटप, वृद्धांना मदत करण्यात आली. तुकसई ही ग्राम पंचायत अतिशय दुर्गम भागातील असून अद्याप दळणवळण साधन नाही, अशा ठिकाणी मदत करणे आवश्यक असल्याचे जिल्हा कोषागार अधिकारी दीपक बोडके यांनी सांगितले. याप्रसंगी शहाजी भोसले, पांडुरंग थोरात, शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी व आदिवासी बांधव उपस्थित होते.

## खालापूर पोलिसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

| वावोशी | प्रतिनिधी |

श्री छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज, वावोशी येथे गुरुवारी ( दि.३०) जुलै रोजी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, पोक्सो कायदा आणि आपत्कालीन सेवांविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमास खालापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण, पंकज खंडागळे, आशा कांगे, रेणुका राठोड, आशिष पाटील उपस्थित होते. पंकज खंडागळे यांनी डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांची माहिती देत इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची खबरदारी समजावून सांगितली. तर पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांनी पोक्सो कायदा, सायबर क्राईम, दामिनी पथक तसेच आपत्कालीन परिस्थितीत वापरावयाच्या हेल्पलाईन क्रमांकांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राशी मरागजे हिने केले.

## 'विकासाला चालना देण्यासाठी मार्गदर्शन करा'



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत शहर हे मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत असून या शहरात झपाट्याने नागरीकरण होत आहे. या नागरीकरणासाठी आवश्यक असलेले नागरी सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी योग्य मार्गदर्शन व्हावे म्हणून कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांनी नगराध्यक्ष महासंघाच्या अध्यक्षा कुळगाव बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे यांची भेट घेतली.

नागरीकरण वाढल्याने कर्जत शहराचे महत्व वाढले आहे. त्यात समृद्धी महामार्ग आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे कर्जत हे मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत आहे. या शहरात वाढलेले नागरीकरणामुळे अनेक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, ही बाब लक्षात घेऊन शहराच्या विकासात नवीन योजना साकारता याव्यात आणि कोणते नवनवीन प्रकल्प राबवले जावेत यासाठी नगराध्यक्षा दगडे यांनी नगराध्यक्ष महासंघाच्या अध्यक्षांची भेट घेऊन चर्चा केली. नगरविकास विभागाच्या नगराध्यक्ष महासंघाच्या अध्यक्षा रुचिता घोरपडे यांची बदलापूर येथे नगरपरिषद कार्यालयात जाऊन भेट घेतली.

या भेटीदरम्यान कर्जत नगरपरिषद नगरसेविका मानसी कानिटकर, ॲड. अक्षय काठावले, योगेश शेलार, विजय काठावले, राहुल घोलप, संकेत राऊत, कुणाल सुरोशे, ऋतुराज गायकवाड उपस्थित होते.

## पर्यावरण संतुलनासाठी व्यापाऱ्यांचा पुढाकार

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानच्या पायथ्याशी वसलेल्या नेरळ येथील हुतात्मा चौक परिसरात निसर्ग संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम पार पडला. नेरळ व्यापारी वेल्फेअर असोसिएशन आणि नेरळ वनविभाग यांच्या माध्यमातून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन केले जाते. यावर्षी देखील नेरळ टेकडी नेरळ व्यापारी संघटनेचे वतीने वृक्षरोपण करण्यात आले. नेरळ येथील हेटकर आळी टेकडी परिसरात विविध प्रकारच्या जंगली १०० झाडांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी विशाल साळुंके, अरविंद कटारिया, कमलेश ठक्कर, मेहुल कटारिया, नीलेश शाह, रवी जैन, नीलेश परदेशी, राहुल शाह, अमित जैन, आशिष जैन, महेश कटारिया, अंकुर शाह, परेश कांतिलाल, नेरळ वनविभागाचे अधिकारी अनिल पाटील, वैशाली जाधव उपस्थित होते.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग,कळवा जि. ठाणे**
**सहकार विद्याप्रसारक मंडळ शाळेसमोर, जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, पीन-४०० ६०५**
Email_eemsddkalwa@yahoo.co.in Phone & Fax No. 022-25374770

**ई-निविदा सूचना क्र.०९ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा B-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | दुग्ध प्रकल्प, दापचेरी ता. तलासरी जि. पालघर येथील कुर्झे धरणावरील वक्रद्वारे १२x५ मी.-३ नग, सेवाद्वार १.२ x १.२ नग आपत्कालीन द्वार १.२ x १.२ मी.-१ नग यांचे सन २०२६-२७ वर्षासाठीचे वार्षिक देखभाल, परिचलन व परिरक्षण कामे तसेच विविध यांत्रिकी घटकभागांना गंजरोधक रंगकाम करणे. |
| | जिल्हा | पालघर |
| | निविदेची किंमत रुपये | रु.१,४७,२४,८०१/-(सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |
| २ | कामाचे नाव | भिरा ज.वि.प्रकल्प, उन्नेयी व उभेयी धरण येथील विविध यांत्रिकी द्वारांची देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक यांत्रिकी कामे |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु. २,४०,४३,०९३/-(सेवा व वस्तू कर आणि विमा वगळून) |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०३-०८-२०२६ ते दिनांक १०-०८-२०२६
निविदा उघडणे : दिनांक १२-०८-२०२६
जा.क्र.यांभांविवि/लेशा-२/१३८८/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे
दिनांक :- २४-०७-२०२६

सही/-
**(सं.ना.रोकडे)**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग,**
**कळवा-ठाणे**


## महागणपतीच्या दर्शनासाठी अलोट गर्दी

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर येथे संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने रविवारी हजारोंच्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. पहाटेच मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले होते. रविवारी सुट्टीचा दिवस आणि पावसाची बऱ्यापैकी उघडीप असल्यामुळे परगावातील गणेश भक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी दिसून आली होती.



यावेळी हार, नारळ प्रसादाबरोबर पावसाळी रानभाज्यांना मोठी मागणी होताना दिसून आली होती. नवी मुंबईसह रायगड जिल्ह्यातील हजारो गणेश भक्त दर्शनासाठी होते. चिरनेर गणपती देवस्थानच्या सर्व मुख्य पदाधिकारी व सदस्यांच्या वतीने चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली बागायत मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. श्रीकांत पांडुरंग पाटील यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ३३९ | ०-३७-७० | ६.८७ |
| या मिळकतीपैकी उत्तर-पूर्व दिशेकडील ०-०७-०० हे. आर. इतके क्षेत्र | | |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- ०१/०८/२०२६

**ॲड.(डॉ.) दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| गंगा वृक्ष लागवड संस्था मर्यादीत तर्फे चेअरमन गंगाधर कारभारी जाधव | ४८ | ५४ | ०-१२-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-शॉप नं.२, तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ,
पुर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही /-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- ०३/०८/२०२६
मो. नं. ९३७२९६४६६५



जा.क्र.१४१३/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारुती मंदिराजवळ,
मु.पो.चेंढरे, अलिबाग जि.रायगड
दि.३१/०७/२०२६.

**चौकशीची जाहीर नोटीस**
नियम ७ अ प्रमाणे

अर्ज क्रमांक : २४७/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- **ADV. ANKIT BANGERA WELFARE TRUST** ..बाबत.

Mr.Ankit Shrinivas Bangera .अर्जदार
Near Maruti Naka, Shardul Housing Society,
E-Wing, Alibag
Tal. Alibag, Dist. Raigad

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम- २०००/-रुपये
(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.


ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ३१.०७.२०२६ रोजी दिली.

**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम )**
सादर सेवा

**खुली ई-निविदा (एक पाकिट प्रणाली) आमंत्रण सूचना**

**कामाचे नाव**: कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे कार्यान्वित करण्यात येत असलेल्या प्रकल्पांमध्ये 1500केवीए, 11केवी आउट पुट व्होल्टेज, 3 फेज, डीजी संचाचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन. निविदा **सूचना क्र.: केआर/सीओ/ईएल/डीजी/टी/15/26, दि.: 03.08.2026. पूर्णत्व कालावधी**: 12 (बारा) महिने. **अंदाजित किंमत**: रु.4,21,44,312/- जीएसटी वगळून. **बोली सुरक्षा रक्कम**: रु. 8,42,900/-. **निविदा ऑनलाइन सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 24.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची वेळ**: 24.08.2026 रोजी 15:30 वा. दुरुस्त्या / शुद्धिपत्रक असल्यास, ते केवळ आयआरईपीएस संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. **निविदा दस्तऐवज सादर करणे**: आयआरईपीएस द्वारे. हस्तचलित निविदा दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत.



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/ करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ८०१ | पेंधर १/२००८ | १७/३<br>२०/१<br>२०/२<br>२०/४<br>२०/७<br>२०/८<br>**एकूण क्षेत्र** | ०-१२-०<br>०-०९-०<br>०-११-०<br>०-३७-२<br>०-११-०<br>०-४०-९<br>**०-६०-०** | १०५० चौ.मी. | भूखंड क्र.१८, सेक्टर-१६, क्षेत्र-१०५० चौ.मी. | कै.परशुराम उंदऱ्या पाटील (मयत) यांचे वारस १) श्री.जनार्दन परशुराम पाटील २) श्री.भाऊ परशुराम पाटील ३) श्री.राजू परशुराम पाटील ४) श्री.अरूण परशुराम पाटील ५) श्री.श्याम परशुराम पाटील ६) श्री.शरद परशुराम पाटील ७) श्रीमती. चंद्रभागा मारूती भोईर ८) श्रीमती. निर्मला जनार्दन पोरजी ९) कै.आनंदीबाई बाळकृष्ण पाटील (मयत) यांचे वारस<br>९.१) सुनिता बाळकृष्ण पाटील उर्फ सुनिता ज्ञानेश्वर दमडे<br>९.२) संतोष बाळकृष्ण पाटील<br>९.३) रूपेश बाळकृष्ण<br>९.४) रतन बाळकृष्ण पाटील<br>१०) द्रौपदीबाई ज्ञानदेव चौधरी | निरंक |
| २ | तळोजा १०८५ | पेंधर १/२००८ | २५४/१A<br>एकूण क्षेत्र | ०-२५-८<br>०-२५-८ | २५० चौ.मी. | भुखंड क्र.२६, सेक्टर-९, क्षेत्र-२५० चौ.मी. | श्री.गजानन शंकर पाटील | - |
| ३ | टेंभोडे | ९२ | ३/२ब | ०-१७-० | १५० चौ.मी. | भूखंड क्र. ७०बी, सेक्टर-२२, क्षेत्र १५० चौ.मी. रोडपाली नोड | कै. मंगळी कृष्णा म्हसकर (मयत) यांचे वारस १) कै. लक्ष्मण गणपत म्हसकर (मयत) यांचे वारस<br>१.१) श्री. मनोहर लक्ष्मण म्हसकर,<br>२) श्री. दशरथ तुकाराम म्हसकर<br>३) श्री. ज्ञानेश्वर चांगा म्हसकर | निरंक |
| ४ | तळोजा ७१८ | तळोजा-पाचनंद ३७/३२४ | ६५/१अ<br>एकूण क्षेत्र | ०-३१-४<br>०-३१-४ | २५० चौ.मी. | भुखंड क्र.७८, सेक्टर-५, क्षेत्र-२५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. पवल-२/२८७०/२०२६ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) जगदीश रघुनाथ पगडे उर्फ कोळी २) राजेंद्र पुंडलिक पगडे उर्फ कोळी ३) रमेश लक्ष्मण पगडे उर्फ कोळी ४)भाविक संजय पगडे उर्फ कोळी (अ.पा.क) संजना संजय पगडे उर्फ कोळी** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |
| ५ | तळोजा १०१ | पेंधर २७० | २४१/१<br>एकूण क्षेत्र | ०-७६-६ पैकी ०-४२-१<br>०-४२-१ | ३५० चौ.मी. | भुखंड क्र.४१A, सेक्टर-२०, क्षेत्र-३५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. पवल-१६६७४/२०२२ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) श्री. मोहन गणा पाटील २) श्री. एकनाथ गणा पाटील ३) श्री. उदय गणा पाटील** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |
| ६ | तळोजा ४१८ | तळोजा-पाचनंद १०६/१२३<br>तळोजा-पाचनंद २७ | ७५/४<br>९६/१+४<br>एकूण क्षेत्र | ०-०२-०<br>०-७०-०<br>०-७२-० | ६५० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. | भुखंड क्र.४३, सेक्टर-१७, क्षेत्र-५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र. पवल-३/७२२०/२०२६ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **श्री. जगदीश दत्तात्रेय घरत** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण/पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१६६/२०२६-२७

# खालापूरमध्ये जंगी स्वागत







**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त खालापूरमध्ये रविवारी (दि.२) शेकापच्या लाल बावट्याचा झंझावात पाहावयास मिळाला. सकाळपासूनच खोपोली, खालापूरचे रस्ते शेकापच्या कार्यकर्त्यांच्या आगमनांनी फुलून गेले होते.

रस्त्याच्या दुतर्फा लाल बावटे मोठ्या दिमाखात फडकत होते. ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या स्वागत कमानी, नेत्यांचे स्वागत करणारे बॅनर्स यामुळे संपूर्ण परिसर शेकापमय झाला होता. पाऊस असतानाही कार्यकर्त्यांनी त्यावर मात करीत या सोहळ्याचे ऐतिहासिक साक्षीदार बनण्यासाठी ते खालापूरमध्ये दाखल झाले होते. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्साह कमालीचा वाढला होता. याचे प्रत्यंतर शेकापच्या स्वागत मिरवणुकीत दिसून आले. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे खालापूर नगरीत आमगन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत, ढोल ताशांच्या गजरात आणि वारकरी दिंडीच्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. सजवलेल्या जीपमधून हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मिरवणूक काढण्यात आली. खालापूरमधील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून वाजतगाजत शेकापचा जयघोष करीत मिरवणूक काढण्यात आली. विशेष म्हणजे, या मिरवणुकीत महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. युवा कार्यकर्त्यांचा उत्साह नजरेत भरणारा होता.

कार्यक्रमाच्या ठिकाणी रॅलीची सांगता झाल्यावर सभा मंडपात पोहोचताच कार्यकर्त्यांनी ''शेकापचा विजय असो'', ''जयंतभाई तुम आगो बढो, हम तुम्हारे साथ है'', ''लाल बावट्याचा विजय असो'', असा जयघोष झाला. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, हर्षवर्धन सकपाळ, रोहित पवार यांचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले आहे. त्या स्वागताने मान्यवर कमालीचे भारावून गेले. शेकापची सर्वसामान्यांशी जुळलेली नाळ पाहून त्यांनी जयंत पाटील यांचे कौतुक केले. दरम्यान, मान्यवरांचे औक्षण करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, माजी आ. बाळाराम पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, संतोष जंगम, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, अनिकेत देशमुख, अरविंद म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान, राज्य पुरोगामी विद्यार्थी संघटना प्रमुख ॲड. ॲड. साम्या कोरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात



## मीनाक्षी पाटील यांच्यासह अनेकांना श्रद्धांजली

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त पक्षातील दिवंगत नेते मंडळींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यामध्ये पक्षाच्या स्थापनेपासून असलेल्या नेतेमंडळींसह शेकापच्या माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील तसेच शेवटपर्यंत पक्षासाठी काम करणाऱ्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तसेच, नीट पेपरफुटी प्रकरणामुळे तणावातून जीवन संपविणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील दिवंगत मंडळींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.








## महाराष्ट्रच नव्हे, तर देशावर फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचे राज्य आणायचेय : ॲड. गौतम पाटील



''शेतकरी कामगार पक्षाचा ७९ वर्षांचा प्रवास हा केवळ एका राजकीय पक्षाचा इतिहास नाही, तर अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, निष्ठेचा आणि पुरोगामी विचारांचा प्रवास आहे. या विचारसरणीला युवकांची साथ मिळाली, तर महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे राज्य आणणे शक्य आहे,'' असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी केले.

शेकापच्या ७९ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, ''इतिहास साक्षी आहे की, प्रत्येक परिवर्तनाची सुरुवात युवकांच्या आंदोलनातून झाली आहे. शहीद भगतसिंगांचे स्वातंत्र्य आंदोलन असो, १९७५ मधील विद्यार्थी चळवळ असो, मंडल आयोगाचे आंदोलन असो किंवा अलीकडील नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात जंतर-मंतर येथे झालेला विद्यार्थ्यांचा संघर्ष असो, अन्यायाविरुद्धचा लढा युवकांनीच उभारला आहे.'' नीट पेपरफुटी प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी सरकारवर टीका केली. ''विद्यार्थ्यांची मागणी केवळ इतकीच होती की, पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा. मात्र, त्यासाठी विद्यार्थ्यांना महिनाभर संघर्ष करावा लागला. त्यांच्यावर दडपशाही करण्यात आली आणि अखेर उशिराने राजीनामा घेण्यात आला,'' असे देखील ते म्हणाले.

शेकापच्या राजकीय संस्कृतीचा दाखला देताना त्यांनी माजी मंत्री स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचा प्रसंग सांगितला. ''पुलोद सरकार कोसळल्याची बातमी कळताच त्यांनी मंत्रीपद संपल्याची जाणीव ठेवून सरकारी गाडीचा वापर नाकारला आणि एसटीने प्रवास केला. सत्ता ही सेवेसाठी असते, मालकीसाठी नाही, हा शेकापचा संस्कार त्या कृतीतून दिसून येतो,'' असे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, ''भारतीय राज्यघटनेने अन्यायाविरोधात सनदशीर मार्गाने लढण्याचा अधिकार दिला आहे. त्याच मार्गाने विद्यार्थी आंदोलन करत असताना त्यांच्यावर दडपशाही करण्यात आली. मात्र, महाराष्ट्रातील युवकांनी शिवाजी पार्कपासून दिल्लीतील जंतर-मंतरपर्यंत आपली ताकद दाखवून दिली.'' डाव्या आणि पुरोगामी विचारसरणीचा उल्लेख करत ॲड. पाटील म्हणाले, ''डावी विचारधारा कधीही संपणार नाही. शेतकरी कामगार पक्षानेही काळानुरूप बदल स्वीकारत युवा नेतृत्वाला संधी दिली आहे. आ. बाबासाहेब देशमुख, अतुल म्हात्रे, ॲड. साम्या कोरडे, चित्रलेखा पाटील यांच्यासारखे तरुण नेते संघर्षाची परंपरा पुढे नेत आहेत.'' सरकारी यंत्रणेच्या गैरवापरावर टीका करत त्यांनी, आगामी राजकीय लढाईचा निर्धार व्यक्त केला. ''महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीच्या माध्यमातून पुरोगामी शक्तींनी एकत्र येऊन लोकशाही, संविधान आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करायचा आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, सामाजिक न्याय आणि बंधुत्वाच्या विचारांचे राज्य प्रस्थापित करण्याचा संकल्प आपण या वर्धापन दिनी करूया,'' असे आवाहन त्यांनी केले.








## पेझारीत लाल बावट्याला सलामी

शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन पेझारी येथील खारेपाट विभागीय कार्यालयात साजरा करण्यात आला. शेकाप नेते रामदास जराते यांच्या हस्ते लाल बावट्याचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पेझारीत लाल बावट्याला सलामी देण्यात आली. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, मुंबई कार्यालयीन चिटणीस राजेंद्र कोरडे, सुप्रिया पाटील, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, विलास म्हात्रे, शरद वरसोलकर, तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेतकरी संघटना तालुका प्रमुख अनिल गोमा पाटील, बाळाराम दांडेकर, कमळाकर म्हात्रे, राजन म्हात्रे, नरेश म्हात्रे, अजित भगत, प्रमोद राऊत, मोहन म्हात्रे, पुजा भगत-गीरी आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ''शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो'', ''लाल बावटे की जय'', असा जयघोष करीत कार्यकर्त्यांनी पेझारीमध्ये जल्लोषात वर्धापन दिन साजरा केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)